मराठे प्रतिष्ठान, मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

परस्परं भावयन्तः
म प्र

अंक ११९ ✿ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✿ सप्टेंबर २०१९

Website : www.marathepratishthan.org

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय

***प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना***
***माझा सस्नेह नमस्कार.***

रविवार, दि. ११ ऑगस्ट २०१९ला अंधेरी येथील मोरेश्वर सभागृहात आपली मराठे प्रतिष्ठानची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली. उपस्थिती ठीक होती. कोषाध्यक्षांनी आय-व्यय ताळेबंद सादर केला. कार्यवाहांनी अहवाल वाचून दाखविला. सर्वानुमते तो संमत झाला. गुणवंत पारितोषिके घ्यायला विद्यार्थी न आल्याने त्यांच्या घरी ती पाठविण्याची व्यवस्था केली जाते. वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज संपल्यानंतर मराठे परिवारातील मान्यवर व्यक्तींचा स्मृतिचिन्हे देऊन गौरव करण्यात आला. श्री. कालिदास मराठे (शिक्षणतज्ज्ञ), श्रीमती कुमुद डोके (चित्रकार), मराठे प्रतिष्ठानच्या कार्यासाठी तन-मन-धनाने झटणारी कार्यकर्ती सौ. नीलांबरीताई मराठे आणि 'हितगुज'च्या संपादिका डॉ. सौ. सुमेधा मराठे या सत्कारमूर्तींचा स्मृतिचिन्हे देऊन गौरव करण्यात आला. यथोचित सुयोग्य व्यक्तींचा सत्कार झाल्याने मराठे प्रतिष्ठानला शोभा आली. मराठे प्रतिष्ठानची शान वाढली. उचित अशी मानपत्रे लिहून ती वाचून दाखविण्यात आली. या अंकात त्या मानपत्रांचा समावेश केला आहे. सत्कारमूर्तींनी सत्काराला उत्तर देणारी यथोचित भाषणे केली. सौ. नीलांबरीताईंचे भाषण या अंकात दिले आहे. सौ. नीलांबरीताईंनी ३०,००० रु. देणगी देऊन आपले दातृत्व सिद्ध केले. मराठे प्रतिष्ठानच्या विश्वस्त श्रीमती सुलभाताई मराठे यांनी सुंदर, भारी किंमतीच्या साड्या नेसवल्या. श्री. कालिदास मराठे यांच्या पत्नी सौ. सुनंदा वहिनी यांनाही आवर्जून साडी नेसवली. श्री. कालिदास मराठे यांच्या कार्यात त्यांचे योगदान मोठे आहे, त्यांचा वाटा मोलाचा आहे हे सांगायला सुलभाताई विसरल्या नाहीत. सुग्रास जेवणाचा लाभ घेऊन राष्ट्रगीत गायनाने सभेची सांगता झाली. असो.

मंडळी, या अंकात तुम्ही काय काय वाचणार आहात? थोडक्यात सांगते. आंबा हा फळांचा राजा आहे. आंबा म्हटल्याबरोबर चित्तवृत्ती प्रफुल्लित होतात. रणरणत्या उन्हाळ्यात आंबा खाण्याचा आनंद आगळाच. अशा या आंब्याविषयी श्री. मोहन मराठे यांनी 'आंबा पुराण' या लेखात आंब्याविषयी सविस्तर माहिती सांगितले आहे. लेखकाचा आंबा हा वीकपॉईंट. अशा या आंब्याविषयी लेखकाच्या मधुर मजेदार आठवणी त्यांनी 'आंबा पुराणण या लेखात सांगितल्या आहेत. लेखाचे नावही समर्पक आहे. वाचताना कंटाळा येत नाही. हा लेख म्हणजे उत्कृष्ट ललित गद्यकाव्यच आहे.

श्री. उदय दत्तात्रेय मराठे लिखित, 'मी येणार आहे' या लेखामध्ये घरी येऊन रूग्णाला सेवा देणाऱ्या व्यक्तीचे विचार व अनुभव मांडले आहेत. स्वतः लेखक आजारी व्यक्तीची सेवा मनापासून करतो. लेखक हे पुण्यकर्मच करतो आहे ते पाहून 'जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुला। तोचि साधु ओळखावा देव तेथेची जाणावा' ह्या अभंगाचे स्मरण होते.

'अरे रे ना.बा. गेले' या मथळ्यातच दुःख आहे. ताटातूट आहे. वेदना आहे. मराठे प्रतिष्ठानला साकार मूर्तरूप आणणारे संस्थापक ना.बा. मराठे यांच्या वा.ग.नी लिहिलेल्या आठवणी वाचून आपल्यालाही गहिवरायला होते. उत्कट भावनेने लिहिलेला हा मृत्यूलेख आहे. तसाच श्रीपाद नारायण मराठे यांच्यावर लिहिलेला श्रद्धांजली लेखही तसाच आहे. मृत्यू हा जीवनापेक्षा अधिक वैश्विक असतो, प्रत्येकाला मरण येतंच, पण प्रत्येक जण

संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०००३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९ • इ-मेल : parbhakar.marathe@gmail.com
मुद्रक : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई - ४०००३१

जगतोच असं नाही. श्री.वा.ग. नी मृत्यूविषयी केलेले चिंतन आणि मोरेश्वर मराठे यांची ‘क्षणभर विश्रांती’ कविता यातही हाच सूर आळविला आहे. निवृत्त कारागृह अधिक्षक श्री. चक्रदेव यांना मिळालेला मानसन्मान पाहून मराठे प्रतिष्ठानला त्यांचा अभिमान वाटतो. असो.

गुणवंत विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन आणि सर्व कुलबांधवांना गणपती उत्सवाच्या शुभेच्छा!

आपली शुभचिंतक

**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे,** (पृ. १२०),

(दि. २० ऑगस्ट २०१९)

## मराठे प्रतिष्ठान विश्वस्त मंडळ


मोहन मराठे – विश्वस्त


आनंद मराठे – विश्वस्त


सुलभाताई मराठे – विश्वस्त


सी.गो. खांबेटे – विश्वस्त

## मराठे प्रतिष्ठान कार्यकारिणी २०१९-२०२२


विजय मराठे– कार्याध्यक्ष


शैलेंद्र मराठे– कार्योपाध्यक्ष


हेमंत मराठे – कार्यवाह


अनंत मराठे – कोषाध्यक्ष


सुमेधा प्र. मराठे – सदस्य


श्रीनिवास मराठे – सदस्य


दत्तात्रय मराठे – सदस्य


श्रीपाद मराठे – सदस्य


उपेंद्र मराठे – सदस्य


विश्वास मराठे – सदस्य


राहुल विद्वांस – सदस्य


प्रदीप मराठे – सदस्य

# संवाद कुलबांधवांसाठी

• श्री. हेमंत अरुण मराठे (पृ. २१), नालासोपारा भ्रमणध्वनी : ९८२२८४७१२०/९२२०६९९५७

नमस्कार

कुलबांधव व भगिनींनो

जूनच्या हितगुज मधील आपल्या संवादानंतर ज्याची आपण आतुरतेने वाट पहात होतो तो (पाऊस) जरा उशीराने का होईना पण आला व सृष्टी ला नावीन्य प्राप्त झाले. मात्र यावेळी त्याच्या मनात काही वेगळच चाललं होतं कारण देशातील काही भागात बेभान होऊन बरसला व लोकांची पळापळ करुन सोडली. मात्र त्याचवेळी देशातील काही भाग असा राहीला की तेथे पाण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे, निसर्गाच्या पुढे मनुष्याचे काही चालत नाही हेच सत्य आहे मात्र आपण ही अशी नैसर्गिक संकटे आली की तेवढ्यापुरते हळहळतो, आपलंच चुकतंय असं म्हणतो परंतु नंतर ये रे माझ्या मागल्या ही परिस्थिती आहे. निसर्गावर आपण करत असलेल्या अत्याचारां मुळेच ही परिस्थिती ओढवत आहे हे जाणून प्रत्येकाने स्वतः मधे बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

या पुरामुळे पश्चिम महाराष्ट्रात खूप वाईट परीस्थिती उद्भवली असून आपले त्या विभागातले कुलबांधव पूरग्रस्त भागात मदत करण्यासाठी अग्रेसर होते हे समजून अभिमान वाटला.

मागील अंकामध्ये मी मुलामुलींच्या विवाहासंबंधी काही लिहिले होते व त्यावर प्रतिक्रिया देण्यास सांगितले होते. पुण्याच्या सौ निलांबरी मराठे यांनी उत्तम प्रतिक्रिया दिली असून ती याच अंकात छापली आहे, तसेच हे वाचून पुण्यातूनच श्री सुधाकर मराठे यांचा फोन आला. ते सेवानिवृत्त असून मोफत विवाहमंडळ चालवतात. त्यांनीही त्यांचे काही अनुभव सांगितले असून आपणापैकी कोणाला त्यांचेशी संपर्क करायचा असल्यास अवश्य करावा.

मंडळी, प्रतिवर्षी प्रमाणे आता गणेशाचे आगमन होणार आहे, मात्र या 'पूरपरिस्थिती'ची जाणीव ठेऊन उत्सव साजरे करणे हे आपले परमकर्तव्य आहे. यंदाही मराठे प्रतिष्ठान तर्फे 'श्री गणेश सजावट स्पर्धा' आयोजित केली जात असून आपण स्वतः केलेल्या सजावटीचे फोटो वेळेवर स्पर्धेसाठी पाठवून द्यावेत. यासाठीचे नियम आपल्या अहवालात दिले होतेच पण आता 'हितगुज'च्या या अंकातदेखील दिले आहेत.

आपल्या 'मराठे प्रतिष्ठान'ची ३७वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि ११/०८/२०१९ रोजी मोरेश्वर हॉल, विजयनगर, अंधेरी पूर्व येथे अतिशय उत्साहात पार पडली.

या वर्षी आपल्या कार्यकारिणीची तीन वर्षांसाठीची मुदत संपली असल्याने पुढील तीन वर्षांसाठी नवीन कार्यकारिणी निवडली गेली, यासाठी अर्ज मागविले होते. १२ अर्ज आले त्यातील एक गोव्याचा असल्याने त्यांना गोवा प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली व उर्वरित ११ जण कार्यकारिणी सदस्य म्हणून बिनविरोध निवडून आले. नवनवीन सभासद संस्थेशी जोडले जात आहेत त्यामुळे आनंद होत आहे. पदाधिकारी म्हणून पुढील व्यक्ती निवडल्या गेल्या. कार्याध्यक्ष : विजय मराठे. कार्योपाध्यक्ष : शैलेंद्र मराठे. कार्यवाह : हेमंत मराठे. सहकार्यवाह : विश्वास मराठे. कोषाध्यक्ष : अनंत मराठे

मुख्य सभेनंतर आपल्या परिवारातील महनीय व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. मागील वर्षीपासून हा पायंडा आपले भूतपूर्व कार्याध्यक्ष रमाकांत विद्वांस यांच्या कल्पनेतून सुरू झाला आहे. यावर्षीचे सत्कार मूर्ती पुढील प्रमाणे. १) श्री कालिदास मराठे, गोवा, शिक्षणक्षेत्र २) श्रीमती कुमुद डोके, चित्रकार ३) सौ निलांबरी मराठे, स्वतःचे क्षेत्र संभाळून प्रतिष्ठान साठी केलेले कार्य ४) डॉ सौ सुमेधा मराठे. हितगुज. प्रत्येकाचे कार्यक्षेत्र वेगळे पण जिद्द अफाट, आपापल्या क्षेत्रात यशस्वी व्यक्तिमत्व. मनःपूर्वक अभिनंदन.

मंडळी, आपल्या कुलवृत्तांताचं अद्ययावतीकरणाचं शिवधनुष्य आम्ही उचललं आहे व त्याची मुख्य जबाबदारी घेतली आहे गेली पाच वर्षे कोषाध्यक्ष म्हणून काम पाहिलेल्या श्रीनिवास मराठे यांनी. या प्रकल्पात काम करण्या साठी कोषाध्यक्ष पदाची धुरा दुसऱ्या व्यक्तीकडे देण्याची त्यांची विनंती कार्यकारिणीने मान्य केली. त्यांना कोणतीही माहिती आवश्यक असेल तेव्हा ते आपल्याशी संवाद साधतील.

आपल्याशी संवाद सुरू होऊन सहा वर्षे झाली! खरंच खूप छान वाटते आपल्याशी संवाद साधताना. आणि प्रतिक्रिया आल्यास उत्साह वाढतो. तेव्हा आपल्या प्रतिक्रिया अवश्य पाठवाव्यात.

चला तर मग आता आपला निरोप घेतो, धन्यवाद

♦

# आंबा पुराण

• श्री. मोहन मराठे (पृ.३६५), खार
भ्रमणध्वनी : ९८१९९६४७६५

आंब्याला फळांचा राजा हे सार्थ नाव दिले आहे ऐन उन्हाळ्यात रणरणत्या वातावरणात आंबा खाणे खूप आनंद देणारे असते. भारताच्या प्रत्येक भागात आंबा पिकतो. हापूस आंबा अल्फोन्सो साहेबानी दक्षिण अमेरिकेतून भारतात आणला म्हणतात. भारतात दशेरी, लंगडा, चौसा बदामी, बेगमपल्ली, हापुस, पायरी, केशर, मानकुरा, रायवळमध्ये शेंदरी, मोसंबी, केळी, कवठी, साखरी असे अनेक कदाचित शेकडो शेकडो जातीचे आंबे पिकतात. कोणत्याही प्रांतात स्थानिक आंब्याच्या गोडीचं अप्रूप असतं आणि त्यामुळे स्थानिक आंब्यांनाच सर्वात जास्त मान असतो. पायरी आंबा आपली पायरी ओळखून असतो, पण हल्ली मात्र हापूसच्या तोडीची चव व किंमत पायरी आंबा मागू लागलेला आहे. मला आंबा, मग तो कोणताही असो, अतिशय आवडतो. फक्त तो आंबट नसावा! उत्तर प्रदेशात ''कोयलियाँ बोले अंबुआकी डालीपर'' असं म्हणतात. आता आंब्यामुळे कोकिला (बेन) गोड गाते की तिच्या गोड गाण्याने आंब्याची गोडी वाढते, हा संशोधनाचा विषय आहे. मोराचा नाच आंब्याच्या वनात फुलतो.

बार्शीला आमच्या शेतात आंब्याची (रायवळ) उझनभर झाडे होती. शेंदरी मोसंबी, कवठी, कलमी ३ चवीचे आंबे होते. एका आंब्याला तर शेपूचा वास पण गोड चव होती. झाडाला आंबे लागले की राखणदार ठेवला जाई. पाडाचे आंबे झाडाखाली सापडू लागले की जवळच्या रविवारी काका आम्हा ५ भावंडांना (५ पांडव) शेतात नेत. आम्ही झाडावर चढून आंबे काढून पिशवीत भरत असू. काका व गडी बांबूला कडेला कापण्याची पात जाळीसकट लांबलेल्या खुडीतून अवघड जागेचे व आम्हाला न दिसलेले आंबे काढत. मी झाडांवर चढण्यात पटाईत होतो. काढलेल्या (उतरवलेल्या) आंब्याचे एका झाडाखाली ४ सारखे वाटे केले जात. १ वाटा राखणदाराला, आंब्याचा चीक आमच्या तोडांवर, उघड्या हातावर उतत असे. आंबे पोत्यात भरुन आम्ही बैलगाडीत घालून घरी परतत असू. एकदा उताराच्या रस्त्यावर आमची बैलगाडी पलटली. चाकं वर आणि पोती खाली. आम्ही गाडीबाहेर फेकलो गेलो. बैल गाडीचे जू सोडून पुढे गेले. सुदैवाने आम्ही अज्ञात शक्तीने गाडी सुलट केली व आंबे पोत्यांत भरून निघालो.

आंबे अढीत पिकवले जात. काका दररोज वरखाली करत कारण एक खराब आंबा सर्व अढी खराब करु शकतो. पिकवलेल्या आंब्यांचा रस ही एक पर्वणीच. तीनचारशे आंबे मोठ्या पातेल्यात थंड पाण्यात ठेवले जात. आम्ही मुले ते मऊ करत असू. कोयीपासून गर अलग केला जाई, दादा काका आंबा पिळून रस काढत. साली कोयी चोखणे ही आमची आंबा मऊ करण्याची बिदागी असे. एरव्ही घरी ज्वारीची भाकरी पण आमरसाबरोबर खायला घरच्या बन्सी खपली गव्हाची लुसलुशीत पोळी. आमरस भरपूर खाल्ला-प्याला जाई. कधी उरल्यास त्याची साले ताटात घालून माळवदावर वाळण्यासाठी ठेवायची. आम्ही मुलांनी कावळा चिमणीवर लक्ष ठेवायचे. आमरसाचे आईस्क्रीम खायचे. देवगडला माझा मेहुणा सुहास बोडसने साटे करण्यासाठी इलेक्ट्रीक कॉईलचा हीटर बनवला आहे. २ तासात आमरसाचे कुरकुरीत Crispy साटे बनवतात. पण त्याचे मार्केटींग होऊ शकले नाही. सुहासमुळे आम्हाला देवगडला हापुस आंब्याच्या वाघाच्या गुहेत आंब्याचा आनंद मनमुराद लुटता येतो.

बार्शीला घरचे आंबे असले तरी अधूनमधून काका बाजारातून आंबे विकत आणत. आंब्याचा (रायवळ) भाव १ ते १।। रु. शेकडा- म्हणजे ६ आंब्यांचा एक फाडा असे २६ फाड्यांच्या १२६ आंबे. त्यावेळी गावातील धनिक हापूस आंबे ६ रु. डझनाने घेत. अबब-किती महाग. रायवल आंब्यामध्येही एक अत्यंत मधुर साखरी आंबा - टेनिस बॉल एवढा गोटी आंबा मी आमच्या शेजारी राहणारे कारी-नारीचे श्री उन्हाळे ह्यांच्याकडे उन्हाळ्यात चाखला आहे. त्यांच्याकडेच केळ्या आंबाही चाखला.

बार्शीजवळ उस्मानाबाद हद्दीवर बारशी म्हणून गाव आहे. S.T स्टँडवर गावच्या ठळक वैशिष्ट्यांचा बोर्ड ग्रामपंचायत लावते त्यावर बारशीत आंब्याची १ लाख झाडे आहेत असा उल्लेख होता. खरोखरच तितकी झाडे असावीत. हजारो आंब्यांनी लगडलेली झाडे पाहिली. जमिनीवर झोपून आंबा तोंडाने तोडावा वादळ पावसाने कच्चा कैऱ्यांचे ट्रक्सच्या ट्रक्स बार्शी बाजारात विक्रीस येत.

आंब्याची एक मजेदार आठवण माझे बॉस शिवाजीराव गिरीधर पाटील ह्यांनी सांगितली. ते महाराष्ट्रात प्रोटोकॉल मिनिस्टर ही होते. भारताचे राष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी दिल्लीहून हैद्राबादला

रेल्वेने निघाले होते. महाराष्ट्र शासनाचे वतीने शिवाजीरावानी नागपुर स्टेशननवर त्यांना हापूस आंब्याची पेटी भेट दिली. शिवाजीरावांशी त्यांचा परिचय होता. ते म्हणाले तुझ्या हापूस आंब्यापेक्षा आमचा आंध्रचा (पेशां की काहीतरी नाव) आंबा मोठा भरपुर रसाचा गोड आहे. तो आंबा म्हटले की माझ्या डोळ्यासमोर आंध्रच्या व्ही. व्ही. एस. लक्ष्मण आणि रोहित शर्मा ह्या घसघशीत शरीराच्या 'बिट्टूचे' चित्र उभे रहाते.

मी सहकारी मार्केटिंग फेडरेशनमध्ये असताना महाराष्ट्र गुजराथमधील आंबा युरोपला निर्यात करण्यासाठी एक शिष्टमंडळ गेले होते. फेडरेशनचे कार्यकारी संचालक श्री. ना. श्री. कुलकर्णी सांगत की ग्राहकासमोर चाकूने एक आंबा मधे गोल कापून त्यातील कोय उचकटून चमच्याने गर चाखायला देत. ग्राहकांना आंबा पसंत पडे. लंडनमध्ये मी स्वतः १ पौंडाला एक असा हापूस आंबा खाल्ला आहे.

ऑगष्ट १९७६ मध्ये आम्ही साखर दौऱ्यात वेस्ट इंडीज मधील जमैका बेटाची राजधानी किंगस्टन येथे एका गुजराथी कुटुंबात जेवायला गेलो होतो. तेथे आमरस पाहून आश्चर्य वाटले. यजमानांनी सांगितले इथे आंब्याची भरपूर झाडे आहेत. पण इथल्या लोकांना आंबे पिकवून खायचे माहित नाही. रस्त्यावर आंब्यांचा सडा पडतो हे लोक पायाने तुडवून जातात पण गुज्जुभाई लोणची आणि आमरस यांचा भरपूर उपभोग घेतात.

दिल्लीला शिवाजीराव व मी आंब्याच्या पेट्या भेटी देत असू. एकदा आंबे आंबट निघाले असे एकाने सांगितले, त्यानं हे ही सांगितलं की पेटीतील आंबे काढून मी लगेच फ्रीजमध्ये ठेवले. आंबट निघणार नाहीतर काय होणार?

**आंब्यांचा राजा**

हापूसला आता मानांकन प्राप्त झाले आहे. पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग येथील हापूस आंब्यालाच हे नाव वापरता येते. कर्नाटक, आंध्र, दक्षिण महाराष्ट्रातही हापुस आंबा पिकतो. गुणाच्या नाही पण किंमतीच्या बाबतीत तो रत्नागिरी हापुसशी स्पर्धा करतो. कोकणातील मराठी वर्तमानपत्रांच्या कागदातून तो पेटीत भरून महाराष्ट्रात विकण्यात येतो. जानेवारी-मार्च महिन्यात कोकणात मराठी वर्तमानपत्रांच्या रद्दीचे भाव वाढतात म्हणे! आंबा उत्पादकांना वाजवी किंमत मिळावी ही मागणी रास्त आहे. पण दर हंगामाच्या आरंभी यंदा आंबा कमी अशी ओरड करून ग्राहकाला जास्त दर द्यावा लागेल अशी मनोभूमिका तयार केली जाते. प्रत्यक्षात इतर ठिकाणच्या हापूस आंब्यानी बाजी मारलेली दिसते. आंब्यासंबधी आरोग्य विषयक किचकट नियमांमुळे मोठ्या प्रमाणावर निर्यात करता येत नाही. कृत्रिमरित्या आंबे पिकल्यासारखे दाखवणे घातक ठरणार आहे.

हापूस आंबा खाण्याऱ्यांची आता आर्थिक गटवारी झाली आहे. जानेवारी मार्च पासून हापुस आंबा खाणारे धनिक, एप्रिलपासून खाणारे मध्यमवर्गीय व मे पासून खाणारे सामान्य अशी विभागणी आहे.

♦

---

# आपल्या सर्वांचे रमाकांतकाका

२८ सप्टेंबर २०१८ रोजी आपल्या प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष रमाकांत काका विद्वांस यांचे दुःखद निधन झाले.

मराठे प्रतिष्ठानच्या कार्यकारिणीत सन २००७ मध्ये सभासद म्हणून काम केलेल्या रमाकांत काकांनी उपाध्यक्ष आणि त्यानंतर २०१३ पासून मृत्युपर्यंत कार्याध्यक्ष म्हणून ज्या जिद्दीने काम केले त्याा सर्वांनी सलामच करायला हवा.

त्यांचा परिचय करून घेण्यासाठी त्यानी लिहिलेले 'मुसाफिरांच्या आठवणी' हे अप्रतिम पुस्तक आहे. परंतु आपले मुखपत्र 'हितगुज' चे अंक असतील तर त्यामधून पण त्यांचे काम कळेल. (अंक ९० ते ९६, अंक १०१, ११०, १११,११५)

त्यांनी वर्षातून दोन वेळा सभासदाना वैयक्तिक पत्र पाठविण्याची पद्धत सुरू केली. ती आठवणीत राहिल. (अर्थात आताचे कार्यध्यक्ष श्री. सीताराम खांबेटे यांनी कायम ठेवली याबद्दल आनंद व्यक्त करतो.)

श्री विनय उपासनी यांनी लोकसत्ता दैनिकात (२३/७/२०१५) बोगदा निमिर्ति करणारा शिल्पी म्हणून जो लेख लिहिला आहे त्यावरून त्यांचे मोठेपण कळते. (हा लेख 'हितगुज'चा अंक १११ सप्टेंबर २०१६ मध्ये छापला आहे.)

त्यांनी 'हितगुज' पत्रिकेत अंक १०१ मार्च २०१३ मध्ये स्वतः च्या पत्नी सौ. शुभाताईंबद्दल लिहिलेले लेखन मनाचा ठाव घेते.

सामाजिक कार्यासाठी त्यांनी दिलेल्या देणग्या आणि आपल्या स्वतःच्या क्षेत्रात केलेले काम आणि मराठे प्रतिष्ठानच्या कामात आणलेली शिस्त त्यांची आठवण आपल्याला करून देत राहिल यात शंका नाही.

असा कार्याध्यक्ष होणे नाही हेच खरे. त्यांना माझ्यातर्फे आणि आमच्या गोमतंक मराठे परिवारातर्फे भावपूर्ण आदरांजली वाहतो आणि हितगुजमधील त्यांचे लेखन वाचण्याची विनंती वाचकांना करून थांबतो.

**– कालिदास बा. मराठे** (पृ. ५४१), गोवा
भ्रमणध्वनीः ९४२३८८२२९०

# अरे रे ना.बा. गेले

• श्री. वा.ग. मराठे (पृ. ५०३)

'**म**राठे प्रतिष्ठान'चे हे अपत्य आपल्या ओंजळीत घेऊन त्याचे जमेल तेवढे कौतुक करून त्याला बालपणासाठी गोव्यात श्री. कालिदास बाळकृष्ण (का.बा.) यांच्याकडे पाठवून पुढच्या अनेक मोठ्या कुटुंबाकडे आशीर्वादपर अनेक हट्ट पुरविण्यासाठी देऊन आपण प्रतिष्ठानला आणि पर्यायाने आम्हांस उपकृत केलेत, त्याची आठवण आम्ही कसे बरं विसरू?

खरं पाहाता बडोद्याला जन्म पावलेले हे प्रतिष्ठानचं हे बाळ मुंबईत हळूहळू मोठे होऊ लागले. त्यातही श्री. ना. बा., श्री. का. बा. आणि श्री. वा. ग. यांनी अगदी वयात येईस्तोवर लाड व कौतुक करून आज मराठे प्रतिष्ठान हे बाळ आता स्वतः च्या पायावर उभे राहिलेले आपण पाहात आहोत. आतापावेतो कितीकजण ह्या कुटुंबात सहभागी झालेले म्हणून सांगू? कै. बापूसाहेब, कै. श्रीधर, कै. सुरेशभाऊ, कै. वामनराव, कै. वामनभाऊ, कै. भाऊसाहेब तर आपल्या बाळाला मांडीवर घेऊनच बसलेले आपण पाहिले आहे. सोबत कै. मालतीबाई असताना दररोजच घरी कितीतरी लोकांचा वेळी अवेळी राबता असलेला आपण पाहिलेला आहे. कै. वि. के. व कै. लक्ष्मण शंकर ह्यांची तर नेहमीच जुगलबंदी पाहायला मिळत असे. त्याबद्दल मध्यस्थी करताना श्री. मोहनरावांची दमछाक झालेली आपण पाहिली आहे. पुण्याचे कै. वामनराव कितीतरी पायपीट करून, उन्हातान्हात फिरून, मराठे प्रतिष्ठानच्या फांद्यांना (नवीन सभासदांना) व अनेक नामवंताना सरळ गळ घालूनच घेऊन आलेले आपण पाहत आलो आहोत. त्यांचा खाक्याच असा की येणारा माणूस मग काहीच आढेवेढे न घेता येत असे.

अशी कितीतरी माणसांची जंत्री पाहिली तर कै. ना. बा. नी जी जी माणसे जोडली त्यांचे प्रतिष्ठानला बहुमोल मार्गदर्शन तर झालेंच शिवाय प्रतिष्ठानला आर्थिक व शारीरिक पाठबळही पुष्कळ मिळाले. पुणे असो, दिल्ली असो किंवा हैद्राबादही. इथे कुठल्याही भाषेचा प्रश्न आड आला नाही. कलकत्त्याहून नांव आले की, त्याचा पाठपुरावा करणेचे काम वा. गं. चे म्हणजे अस्मादिकाचे. भरीला श्री. का. बा. हवेतच. गोव्यात लगेच त्याची कारवाई होत असे. मला काम फत्ते झालेले पत्र येत असे. कै. ना. बा. ना उलटपत्री कळवले जाताच दुसरे एखादे नाव कळवले जात असे. असा हा प्रवास. कलकत्ता, मुंबई. गोवा व इतर भारतभर शोधमोहीम अविरत होत असे.

त्यामध्यें विद्वान, अभ्यासू, उद्योगपती व विदुषी पण असत. कुणाला आर्थिक भार उचला असे सांगावेच लागत नसे. अगदी स्वत:हून कार्यकारी समितीत काम करायला येत असत. परिचय वाढवत असत व थोडीफार मदतही करत असत, मुख्य म्हणजे खेळीमेळीच्या वातावरणातच सभा चालत असत. कै. ग. वि. तर सभेपूर्वी पंधरा मिनिटे हजर असत. जो तो स्पष्ट व आपापली प्रांजल मते मांडत असे.

मराठे प्रतिष्ठान म्हणजे प्रत्येकाचे कुटुंबच होते. काही वर्षापूर्वी पुण्यातील वर्धापनदिनाला कै. ना. बां. ची उपस्थिती होती. त्या सभेत त्यांचा सत्कारही करण्यात आला होता व गंमत म्हणजे त्या सभेत कै. ना. बा. नी मला उद्देशून श्री. वा. ग. नी विमान कंपनी चालवावी असे गंमतीने म्हटल्याचे आठवते. मी आणि विमान ही तर स्वप्नातील गोष्ट होती. परंतु त्यांचे ते शब्द मला अजूनही आठवतात. त्यांची माझी बऱ्याच विषयांवर चर्चा होत असे. तर कै. केवलानंदाचे साथीदार बनून पेटीवादन हे त्यांचे आवडीचे काम व त्यांतच कै. केवलानंदाचा सूर पकडून ते पुढे चालत आलेले. म्हणूनच की काय, पण केवलानंदांच्या आशीर्वादाने तर मराठे प्रतिष्ठान पुढे चालले आहे व अजूनही चालत राहील, वाढीला लागेल. त्यातच जुने झाले गेले विसरून जाऊ. पुढे पुढे जाऊ असेच म्हणून एका खिन्न मनाने मी त्यांना श्रद्धांजली अर्पण करतो. ♦



## 'हितगुज'ला जाहिराती द्याव्यात

अभिनंदन, अभिष्टचिंतन, पुण्यतिथी, पुण्यस्मरण, साठावा वाढदिवस, अमृत महोत्सव, सहस्रचंद्रदर्शन या निमित्ताने किंवा आपल्या उद्योगव्यवसायाच्या जाहिराती देऊन 'हितगुज'ला सहकार्य करावे.

पाव पान रु.600/-, अर्धे पान रु.1200/-, पूर्ण पान रु.2500/- रक्कम 'मराठे प्रतिष्ठान' नावाने संपादिकेच्या पत्त्यावर चेकने पाठवावी. किंवा IDBI बँक दादर (पश्चिम) शाखेतील बचत क्र. 0501104000043519 मध्ये रोख किंवा चेकने भरा. वरील खाते क्र. 16 आकडी असून सुरुवातीचा 0 आकडा लिहावा. अशा रीतीने पैसे भरल्यावर आपले नाव पत्ता, पैसे भरल्याचा दिनांक व कारण, भ्रमणध्वनी, रक्कम आदी माहिती info@marathepratishthan.org या ई-मेलवर कळवावी. म्हणजे पावती पाठविता येऊ शकेल.

# कै. श्री श्रीपाद नारायण मराठे (दादा) यांना श्रद्धांजली

• श्री. गोविंद नारायण मराठे (पृ.५३८), पाळी–डिचोली(गोवा)



आम्ही चार भाऊ व चार बहिणी. यापैकी तीन बहिणी वारल्या व सर्वांत लहान हयात आहे. चार भावांपैकी सर्वांत वडील बंधू कै. श्रीपाद नारायण मराठे त्यांना आम्ही दादा म्हणत असू. त्यांचे दि. १० मार्च २०१९ रोजी पुणे येथे वार्धक्याने वयाच्या ८८ व्या वर्षी दुःखद निधन झाले. आम्ही मुळचे पाळी. ता. डिचोली–गोवा येथील. परंतु व्यवसायानिमित्त बेळगाव, कोल्हापूर, पुणे येथे राहिलो. दादांचा जन्मही पाळी येथे २६ जून १९३० रोजी झाला. आमच्या घराण्यांत प्रथम पुत्ररत्न म्हणजे दादा. एवढे आयुष्य आजपर्यंत कोणाच्याही वाट्याला आले नाही. दादा म्हणत आईकडून आम्हाला ही देणगी मिळाली आहे. कारण आमची आई ८४ व्या वर्षी गेली. दादा मध्यम शरीरयष्टीचे होते. गोरेपान, तांबूस वर्ण. त्यांच्या संपूर्ण आयुष्याचा इतिहास – आपले आत्मचरित्र त्यांनी ''मराठेंची बखर'' या पुस्तकरूपाने लिहून ठेवला आहे. त्यांत आमचे मूळ घराणे, वंश विस्तार, कर्तृत्व. आयुष्यातील कटू गोड प्रसंग, प्रगतीचा आलेख वाचावयास मिळतो. १९ वे २० वे शतक अशी नोंद आहे. प्रत्येकाने आत्मचरित्र लिहावे. पुढच्या अनेक पिढ्यांना त्याचा उपयोग होतो. आपणास नमुन्यादाखल प्रत पाठविणार होतो. पण त्यांत खासगी वितरण असा उल्लेख असल्याने पाठवू शकत नाही. त्यांची द्वितीय कन्या सौ. प्रियांका प्रकाश कुलकर्णी, कोल्हापूर हिने थोडक्या शब्दांत, पण ठळक गोष्टी जून १९ अंकात श्रद्धांजली या सदरांत प्रसिद्ध केल्या आहेत. तिचे माहेरचे नाव वंदना श्रीपाद मराठे. अखेरच्या काळांत दादांचा तिने सांभाळ केला. जावई श्री. प्रकाशराव यांचाही मोठा हातभार आहे. दादांनी आम्हा सहा भावंडाना शिक्षण दिले, पुढील उपजीविकेचा पाया घातला. त्यावर आम्ही संसाररूपी इमारत उभी केली. अनेक संस्थाना त्यांचा हातभार लागला आहे. चित्पावन ब्राह्मण संघ, बेळगाव. गोव्यांतील श्री. वडदेव देवस्थान होंडा, कुळण येथील योगेश्वरी देवी तिस्का उसगांव येथील श्री. दत्तमंदिर. सर्वांत मोठे कार्य म्हणजे विवाह जुळविणे. त्यांच्यामुळे अनेकांचे संसार सुरळीत चालू आहेत. गोमंतकाच्या स्वातंत्र्य लढ्यात गुप्त रितीने त्यांनी कार्य केले. पोस्टातील केंद्र सरकारची नोकरी होती. मी विद्यार्थी होतो. त्यांच्या कार्याचा मी साक्षीदार आहे. ते मृदुभाषी होते. आयुष्यात त्यांचे कोणाशीही वैर नव्हते. ते शत्रूलाही लाघवी भाषेत आपलेसे करत. वयाच्या ८६ व्या वर्षी त्यांनी आत्मचरित्र लिहिले. बारीकसारीक तपशिलासह त्यात नोंदी आहेत ज्या आम्हाला माहित नाहीत. प्रचंड स्मरणशक्ती, विषयाचा अभ्यास, नोकरी सांभाळून निवृत्त होण्यापूर्वी, बी.ए.ची त्यानी परीक्षा चांगल्या गुणांसह संपादन केली. लोकसभा असो विधानसभा केव्हांही मतदानाचा हक्क त्यांनी चुकविला नाही. याचे उदाहरण कर्नाटक विधानसभेची निवडणूक शेवटची. सात वर्षापूर्वी आमची वहिनी वारली. तिच्या आजारपणात त्यांनी साथ दिली. त्यांच्या भाग्यांत ते आजोबा झालेच पण पणजोबाही झाले. फारच थोड्यांना हे भाग्य लाभते. त्यांचे प्राथमिक शिक्षण पाली व बांतेसत्तरी येथे मामाकडे झाले. पुढील शिक्षणातील कष्टाचे डोंगर, अडचणी सांगायचे झाल्यास कागद अपुरे पडतील. प्रामाणिक, सज्जन, पापभिरू, मदतीचा हात देणारे हे बहुगुण होते. राजकारणांत त्यांचा रस होता. आपली मातृपितृ भूमी गोमंतकाबद्दल प्रेम होते. माझ्याकडून निवडणूक निकालाचे पेपर ते मागवून घेत असत. संस्कृत व गणित विषयांत त्यांचा हातखंडा होता. अनेक छंदाचे त्यांच्याकडे भांडार होते. वाचन, लेखन, टी.व्ही., आकाशवाणीवरील बातम्या, निष्कर्ष, तिकीट, नाणी व महत्त्वाच्या पुस्तकांचा संग्रह. संपूर्ण आयुष्य बेळगांव, कर्नाटकमध्ये गेले तर काही वर्षे महाराष्ट्रातील कोल्हापूर. बेळगाव, निपाणी वगैरे सीमा भाग महाराष्ट्रात विलीन झालेला त्यांना पाहायचा होता. पण हयातीत ते शक्य झाले नाही. म्हणून त्यांना पुण्यनगरींत पुण्यमरण आले. कालाय तस्मै नमः दुसरे काय? आमच्या मराठे कुटुंबाचे ते दादा होते. लघुकथा लिहीत ते पुतणीकडून कळले. मोडी लिपी, जी आईला लिहिता वाचता येत असे. ती त्यांनी सहा महिन्यात पूर्ण करून प्रमाणपत्र मिळविले. कोणत्याही गोष्टीचा ध्यास घेतला की तो पूर्ण करेपर्यंत ते स्वस्थ बसत नसत. त्यांचे किती पैलू सांगावे. पूर्णायुष्य ते जगले. त्यांच्यानंतर मीच मोठा भाऊ असल्याने कृतज्ञतेचे दोन शब्द लिहावेसे वाटले. हीच खरी श्रद्धांजली. जन्मोजन्मी दादांसारखे मोठे भाऊ लाभावेत, हीच परमेश्वरापाशी प्रार्थना! त्यांना सद्‌गती व चिरशांती लाभो! जय श्रीराम.

♦

# मी येणार आहे

• श्री. उदय दत्तामय मराठे (पृ.३३६), मुलुंड दूरध्वनी – ९८९२२६५६४४

**मी** कोण आहे हे सांगणे थोडे अवघड आहे. माझे अस्तित्व आपण किती तरी ठिकाणी पाहिलेही असेल. ज्यांनी कोणी अनुभवले असेल त्यांच्या मी लक्षात असणार आहे.

माझी ओळख म्हणजे सेवक. दास म्हणालात तरी हरकत नाही. परिपूर्ण एकत्र कुटुंब म्हणजे आजी, आजोबा, नातवंडे, आई, बाबा, काका, काकू हे सर्व आलेच म्हणा. एखाद्या अपघाताने किंवा आजारपणामुळे घरामधे एखाद्या व्यक्तीवर अशी आपत्ती येते आणि संपूर्ण सुखवस्तु व एकत्र कुटुंबातील घरचे वातावरण पार ढवळून जाते. अशांमध्ये वृद्धांची संख्या जास्त आहे. मग प्रश्न असा उद्‌भवतो की ह्यांच्याकडे बघणार कोण? कारण प्रत्येक जण आपल्या व्यक्तीगत बांधिलकीमधे व्यस्त असतो. मुले व सुना ह्या नोकरी/व्यवसाय असल्यामुळे व त्यातून खऱ्या अर्थाने प्रत्येकाला वेळ देता येईल असे नाही. पण कोणीतरी त्यांच्याकडे पूर्णपणे लक्ष देइल अशा व्यक्तीची शोधा शोध सुरु होते. ती व्यक्ती म्हणजे मी.

कुणीतरी सुचवतो की अमुक ठिकाणी मी एका व्यक्तीला पाहिले आहे. कुणी गुगल वा इंटरनेटवरून माझा शोध घेण्याचा प्रयत्न करतात. माझी ओळख एखाद्या ब्युरोमधून होते व ती कायम तशीच राहते. वय विचारणे योग्य नाही कारण ब्युरोमधून काम करतांना आयुष्याची किती वर्षे सरली हे सांगणे आवघड आहे. माझी सेवा ही काळाची गरज आहे, अर्थात माझी देखील, हे सत्य नाकारता येत नाही कारण दोघेही परिस्थितीने पिडीत आहोत.

मी रुग्णापासून २५-४० कि.मी दूर वरून येतो. माझादेखील परिवार आहे. घरच्या जवाबदाऱ्या आहेत. शिक्षण फारसे नाही पण अनुभवाची शिदोरी पुरेशी आहे. स्वेच्छेने येण्यापेक्षा परिस्थितीने ह्या गोष्टी आपल्यावर लादल्या आहेत ही वस्तुस्थिती आहे. परिस्थितीपुढे कुणाचेच काहीच चालत नाही. रूग्णाच्या परिवारामध्ये माझे आगमन सर्वांना खूप दिलासा देऊन जाते. त्याची सेवा करतांना मी परिवाराचा एक भाग होऊन जातो. रुग्णातील शारिरीक व मानसिक बदल रोज नव्याने अनुभवतो. माझी गरज ही काही दिवसांसाठी, काही महिन्यांसाठी किंवा वेळ पडलीच तर किंबहुना जास्त देखील असू शकते.

माझ्या कामाचे स्वरुप म्हणाल तर रुग्णाची सेवा. मला रजा नाही. रजेच्या दिवसाचे उत्पन्न नाही. माझ्या बदली दुसऱ्याची सोय करून द्यावी लागते. मला तर रुग्णाशी संवाद साधून माझे कार्य करावे लागते. रुग्ण बरंच काही सांगून जातात. मनातल्या साठलेल्या गोष्टी भडाभडा बोलून जातात. अश्रुंना वाट मोकळी करून झाल्यावर हायसे वाटणारे रुग्ण कितीतरी बघितले. अशांना झोपेची गोळी न घेता सुद्धा शांत झोप लागते.

वाढत्या वयामुळे, विविध आजारांमुळे माझी गरज हा समाजाचा घटक झाला आहे. घरकाम, जेवण बनवणे, मुलांचा सांभाळ करणे, पोळ्या/भाकऱ्या करणे, ह्या कामासाठी व्यक्तीची गरज असते, तितकीच माझी देखील. अर्थात माझे काम इतरांहून वेगळे हे निश्चितच. माझ्या कामाचे स्वरुप व पद्धत ही भिन्न आहे.

रुग्णाची जबाबदारी माझ्यावर सोपवून घरातील कर्त्या व्यक्ती बिनधास्त असतात. त्यांची सेवा करावयाची इच्छा आहे वा नाही हे समजणे खूप अवघड आहे. प्रत्येक जण त्यातून पळवाटा शोधीत असतो हे सुद्धा अनुभवले आहे. भेटायला येणाऱ्या मंडळीं समोर माझे कौतुक चालले असते. अर्थात मला ह्या गोष्टीची सवय झाली आहे कारण मी माझ्या कामाशी पूर्णपणे प्रामाणिक आहे.

एखादी व्यक्ती आजारपणामुळे अंथरुणाला खिळलेली पाहून खूप दुःख होते, कींव येते. पूर्वी खूपच त्रास वाटायचा, पण आता सवयीमुळे फारसे काही वाटत नाही. ब्यूरो चालक परिवारास समजावतात की सेवा देणारी व्यक्ती योग्य आहे. ते स्वतः जाऊन परिस्थितीची पाहणी करतात व नंतर ठरवतात की कोण हे काम करु शकेल. परिवारातील व्यक्तींना समज देतात की आपण त्याच्याकडून चांगल्या कामाची अपेक्षा करत असाल तर इतर कामे त्याच्यावर लादू नका. हे सर्वांच्या हिताचे आहे. रुग्ण सेवेमध्ये काय शिकलो असं विचारले तर एक नाही तर कितीतरी गोष्टी सांगता येतील. काही परिवारातल्या लोकांनी शिकवल्या तर काही स्वतःहून काही नर्सिंग संबंधीत तर काही करता करता शिकलो.

बरेच वेळा बेडवर असलेल्या व्यक्तीत झपाट्याने होणारे बदल बरच काही शिकवून जातात. परिवार सदस्यांच्या नजरेस आणून दिले जाते. मग डॉक्टर येऊन तपासून जातात. पूर्व कल्पनाही देऊन जातात. मी देखील अंदाजाने व अनुभवाने ह्या गोष्टी पडताळून पाहतो. त्याची नोंद करून ठेवतो. काही वेळा तर माझ्या डोळ्या देखत रुग्णाने अखेरचा श्वास घेतलेला पाहिला आहे. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून एखादा परिवार सदस्य सोबत असतोच. त्याक्षणी परिवारातील सदस्यांप्रमाणे माझ्याही डोळ्यात अश्रू असतात. माझ्याकडे बघण्यासाठी कुणालाही वेळ नसतो एका रुग्णाला मरेपर्यंत सेवा देण्याचे समाधान अश्रू देऊन जातात. जे कार्य परिवारांतील सदस्यांना जमले नाही ते करायचे भाग्य माझ्या नशिबी होते. ♦

# कॉटनची साडी

• डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृ.१२०), वडाळा    दूरध्वनी – ०२२ २४१५०८८९

**आ**ज २५ मे. पद्मजाबाईचा उत्साह अगदी ओसंडून वाहात होता. त्यांच्या मोठ्या मुलाचे – आशुतोषचे लग्न ठरले होते. संध्याकाळी साखरपुडा होता. आशुतोष एम.बी.बी.एस. डॉक्टर होता. त्याची प्रॅक्टीसही उत्तम चालू होती. त्याला डॉक्टर बायको नको होती. पती-पत्नी दोघेही डॉक्टर म्हटले की कायम कामात व्यग्र. त्यांच्यासाठी दिवस नुसता, कुठल्याही स्टेशनवर न थांबता, चाके लावलेल्या वेगवान आगगाडीसारखा धावत असतो. रात्री-अपरात्रीसुद्धा पेशंटला तपासायला, त्याच्यावर उपचार करायला, हातातला घास सोडून धावावे लागते. त्याला दिसायला सुरेख, गोरी, आणि पदवीधर वधू हवी होती. ती नोकरी करणारी हवीच अशीही त्याची अट नव्हती. मनमिळाऊ, चांगल्या संस्कारात वाढलेली असावी असे त्याला वाटे. तसेच घराचे 'घरपण' जपणारी, प्रेमाने, आत्मियतेने वागणारी गृहिणी 'पत्नी' म्हणून हवी होती. आणि तशी ती मिळाली म्हणून सर्वजण आनंदात होते. पद्मजाबाईंच्या चेहऱ्यावरचे उत्साहाचे भाव लपून राहिले नव्हते. कितीतरी दिवसांनी आपल्या आईला अशी आनंदात असलेली आशुतोषने पाहिली.



साखरपुडा म्हणजे मिनीलग्नच असते म्हणा ना आजकाल. खूप पैसे खर्च करून थाटामाटात लग्नाचा सोहळा साजरा करावा त्याप्रमाणे साखरपुडे साजरे केले जातात. लग्न अगदी पंधरा दिवसांवर ठरले असेल, तरीही घाईघाईत साखरपुडा केला जातो. नियोजित वर वाग्दत्त वधूच्या गळ्यात मोठाल्या फुलांचे हार घालतो. वधूही वराच्या गळ्यात हार घालते. एकमेकांना पेढा भरविला जातो. वराकडल्या पाच सुवासिनी औक्षण करून सौभाग्यकांक्षिणीची ओटी भरतात. वधुकडल्या पाच सुवासिनी वराला ओवाळतात. अंगठी घातली जातो. फोटो समारंभ – नातलगांची ओळख केली जाते.

...पद्मजाबाईंना विहीणबाईंनी छानशी, भारी किंमतीची अबोली रंगाची – त्यांच्या गोऱ्या वर्णाला शोभून दिसेल अशी पॉलिस्टर साडी देऊन त्यांच्या सन्मान केला.

...साखरपुडा म्हणजे वधु-वरांना मुक्तपणे विहरण्याचा परवानाच मिळतो. पद्मजाबाईची (भावी) होणारी सून अपर्णा आणि आशुतोष अेकमेकांच्या घरी जा-ये करू लागले. आशुतोषचे, होणाऱ्या जावयाचे, अपर्णाच्या घरी खूप कौतुक व्हायचे. आधी जावयाचे कौतुक करण्याची आपल्याकडे फार आवड असते. त्यातून अशुतोष नामांकित डॉक्टर. मग काय विचारता? अर्पणाही आशुतोषच्या घरी कधी प्रसंगापरत्वे तर कधी सहज म्हणून वरचेवर ये-जा करू लागली. त्यामुळे परकेपणा कसा तो अुरलाच नाही.

...परवा अशीच अपर्णा आशुतोषच्या घरी आली. पद्मजाबाई बाहेर जाण्याच्या घाईत होत्या. भगिनीमंडळाच्या वार्षिकोत्सवाच्या कार्यक्रमाला त्या जायला निघाल्या होत्या. त्यांनी निळेबुट्टे असलेली, लाल रुंद काठांची पण 'कॉटनची' साडी परिधान केली होती. मुळात सुंदर असलेल्या पद्मजाबाई अधिकच रेखीव दिसत होत्या.

...अपर्णा अुस्फूर्तपणे म्हणाली, 'वाऽऽ, वा ऽ व्... ब्युटीफुल,' किती छान दिसता हो आई, तुम्ही या साडीत!...

पद्मजाबाई म्हणाल्या, 'आम्ही मद्रास- कन्याकुमारी ट्रिपला गेलो होतो न तेव्हा कांचीपुरमला ही साडी घेतली. खास 'ह्यांच्या' पसंतीची. बरं का अपर्णा, ह्यांना मुळात साड्या, दागिने यात फारसा रस नव्हता. हे ओळखून मीही त्यांच्या कामाचा महत्वाचा वेळ कधी खरेदीत मोडला नाही. मी एकटीच किंवा कधी मैत्रिणीला बरोबर घेऊन खरेदी करायची. साडी आणून दाखविली की त्यांना आवडायचीच, म्हणायचे तुला काय ग, कुठलाही रंग शोभून दिसतो, जातीच्या सुंदरा...'

ह्यांच्या पसंतीची साडी म्हणून माझ्या सर्व साड्यांमधे हिला खास महत्व आहे, 'सांभाळून' मी ती नेसत असते.

...मग अपर्णाने सहज विचारले, ''आमच्या साखरपुड्याच्या साडीची घडी मोडली की नाही हो आई?''

''आता दसरा जवळच आला आहे तेव्हाच साडीची घडी मोडीन.'' पद्मजाबाई म्हणाल्या आणि कार्यक्रमाला गेल्या. पण कार्यक्रमात त्यांचे लक्ष लागत नव्हते. दसरा साडेतीन मुर्हूतातला अेक शुभ दिवस. त्यादिवशी साखरपुड्याच्या साडीची घडी

मोडणार असे आपण मारे ठसक्यात, अपर्णाला सांगितले आणि वेळ निभावून नेली. पर खरंच आपण ती पॉलिस्टर साडी नेसू शकू का? आणि आपण घेतलेल्या शपथेचं काय? दिलेलं वचन कसोशीनं पाळू असं आश्वासन दिलाय त्याचं काय? तिला सर्व कसं पटवून द्यायचं?...

...पुन्हा त्यांचे विचारचक्र सुरू झाले. कदाचित अपर्णा विसरुनही जाईल साडीचे. ती स्वतःच्यात किती दंग असते, आणि आपल्या आशुतोषनेही तिला लळा लावून किती वेडं करून टाकलं आहे. ती विसरली तर आपल्या पथ्यावरच पडेल. आणि तो विषय तेथेच राहिल.

''कार्यक्रम किती छान झाला नाही? पद्मजाबाई तुम्ही घरी कशा जाणार? आज गाडी आणली आहे का? मला लिफ्ट मिळणार का'' मंगलाताईंच्या या भडिमार प्रश्नांनी त्या भानावर आल्या. गाडीत मंगलाताईंच्या तोंडाची टकळी सारखी चालू होती. पद्मजाबाईंना अनेक बातम्या आणि मंडळातील बायकांच्या उचापती, कोणाच्या तरी भानगडी त्यांची इच्छा नसतानाही अैकाव्या लागत होत्या. माधवराव - त्यांचे पती गेल्यापासून तर त्यांना एकटीला 'घर' खायला उठत असे. म्हणून भगिनीमंडळात जाऊन त्या त्यांचे मन रमविण्याचा प्रयत्न करीत. विरंगुळा म्हणून, दुःख हलके होते म्हणून गाण्याच्या कार्यक्रमांनाही त्या जात असत. त्यांची अभिरूची अुत्तम होती. पत्ते कुटण्यात, पार्ट्या करण्यात, भटकण्यात त्यांना स्वारस्य नव्हते. त्यांची गाण्याची आवड लक्षात घेऊन, आशुतोषने अनेक गाण्यांच्या सीडीज रिदम्हाऊस, प्लॅनेटएम मधून आणल्या होत्या. घरकाम, स्वयंपाकाचे आटोपल्यावर पद्मजाबाई कॉम्प्युटरवर गाणी अैकायच्या.

अलीकडे त्यांना ''राधा गवळण, करिते मंथन, अविरत हरिचे मनात चिंतन'' हे गाणे खूप आवडायला लागले होते.

राधा! केवळ दोनच अक्षरं! पण ती अैकली की मनाच्या गाभाऱ्यात कुठेतरी मोरपिशी सळसळ होते! राधा! अबोध मानवी मनाला पडलेलं एक सुरेख स्वप्न! मानवी मनाचे व्यवहार किती व्यामिश्र आणि गुंतागुंतीचे असतात, याची साक्ष देणारी व्यक्तिरेखा म्हणजे चिरंतन विरहिणी-प्रणयिनी राधा! त्या सावळ्या तनूचे पिसे लागलेली, अनिवार तरीही संयतओढीने कृष्णरुपाला भजणारी, शतकानुशतके अतर्क्य स्त्री मनाचे प्रतीक होऊन राहलेली 'राधा' गवळण, पद्मजाबाईंना साद घालायची.

आता अपर्णासारखी लाघवी, गोड मुलगी घरात येऊन प्रेमाचा अेक आगळाच रंग घरभर दरवळणार होता. पद्मजाबाईंना वाटायचं, कोणतीही नाती अेकमेकांना कायमची बांधून ठेवण्याएवढी खरोखरच घट्ट असतात का? अपर्णाविषयी त्यांना अपार प्रेम वाटू लागलं. तिला या घरात काही कमी पडू द्यायचे नाही. सुखाच्या पाळण्यात तिला ठेवायचे. तिच्या इच्छेला मान द्यायचा. तिचा शब्द पाळायचा; असे त्यांनी मनाशी ठरवून टाकले.

...विजयादशमी! दसरा! आज अपर्णा आली हातात निशिगंधाच्या उंच काड्या घेऊन एखाद्या प्रसन्न सकाळसारखी!

पद्मजाबाईंना वाकून तिने नमस्कार केला आणि त्यांचे शुभ आशीर्वाद घेतले. चहा घेता घेता आपण तिघं आज सिद्धिविनायकाला जाऊ असा प्रस्ताव तिने आशुतोषकडे मांडला. आशुतोषनेही आनंदाने त्याला संमती दिली. प्रथम पद्मजाबाईंनी आढेवेढे घेतले, तुम्ही दोघेच जा मी कशाला अुगाच, वगैरे म्हणून पहिले पण अपर्णा हट्टी. ती म्हणाली, ''आई, तुम्ही येणार नसाल ना आमच्याबरोबर तर आम्हीही कॅन्सल करतो आमचं जाणं?'' यावर पद्मजाबाई काय बोलणार? त्या निघण्याच्या तयारीला लागल्या. अपर्णा बाहेरच्या खोलीतून बेडरुमकडे डोकावीत म्हणली, ''आणि हो आई, आमच्या साखरपुड्याच्या साडीची घडी मोडा आज. तुम्ही मला त्या दिवशी प्रॉमिस केलं आहे, होय ना? दसरा आहे म्हटलं!''

''बघते ग आज, नंतर कधी तरी नेसेन साखरपुड्याची साडी.'' पद्मजाबाई आतूनच म्हणाल्या, 'पद्मजाबाईंनी दुसरीच कॉटनची साडी नेसलेली पाहून अपर्णा नाराज झाली.' ''आई तुम्हाला ती साडी आवडली नाही का? दुकानातून बदलून आणूया का?''

''नाही ग.. तसं काही नाही, आवडली आहेन ती साडी...'' पद्मजाबाई चाचरत कशाबशा बोलल्या. ''आई, तुम्हाला कॉटनच्या साड्या जास्त आवडतात का हो?'' अपर्णाने विचारले. त्या 'हो' म्हणाल्या. तिघेही सिद्धिविनायकाचे दर्शन घेऊन, प्रसाद घेऊन घरी आले. पद्मजाबाईंनी साखरपुड्याच्या साडीची घडी मोडली नाही म्हणून अपर्णा खट्टू झाली होती. अशुतोषजवळ तिने त्यासंबंधी अपापली नाराजी दाखवली. आशुतोष म्हणाला, ''अे, वेडाबाई, साडी-बिडी सारख्या मामुली गोष्टीत अेवढं काय ग विशेष आहे नाराज होण्यासारखं?''

''अशुतोष आई नेहमी कॉटनची साडी नेसतात का रे''

''हो, बहुतेक. कां ग?''

''काही नाही...''

त्यानंतर त्यांच्या लग्नाच्या खरेदीला सुरुवाता झाली. अपर्णाने आर्टगॅलेरीतून तिच्या आवडीचे पंजाबी ड्रेसेस घेतले आणि आईंसाठी साड्या घ्यायला ते साड्या घ्यायला ते साड्यांच्या दुकानात गेले. तेथे सुद्धा जॉर्जेट, शिफॉन, ॲम्बोस सॅटीन, वेलवेट बॉर्डर, माक्रो चौकडा साडी, रेशमपट्टा, फॅन्सी बॉर्डर, रेशम जरी, हॅन्ड प्रिंट, जपान क्रेप, पार्टीवेअर फॅन्सी साड्या या पैकी कोणतीही साडी पद्मजाबाईंनी निवडली नाही. मोरपंखी पिसांचे

डोळे असलेली प्युअर सिल्क साडी त्यांना बहुतेक आवडली असावी. त्यांनी साडीवरून हळुवार हात फिरवला, पदराचे डिझाईन पाहिले, फारच छान आहे म्हणाल्या.

अपर्णा म्हणाली, ''घ्या न आई ही साडी तुम्हाला!'' ''नको, माझ्यासाठी नको, तुला घे. मी फक्त कॉटनसाडीच नेसते.''

अपर्णाला आई फक्त कॉटनसाडीच नेहमी का नेसतात याचे रहस्य वाटू लागले. आई काही तरी आपल्यापासून लपवाताहेत असे तिला वाटू लागले. आईंना मोकळेपणी कसं बोलतं करायचा हा तिला प्रश्न पडला.

...नेहमीप्रमाणे अपर्णा अशीच दुपारची घरी आली होती. आशुतोष व्हिजीटला गेल्यामुळे, त्याला अुशीर होणार असल्याचा फोन आला होता. घरात पद्मजाबाई आणि अपर्णा दोघीच होत्या. अनेक विषयांवर नेहमीप्रमाणे गप्पा चालल्या होत्या. पद्मजाबाई त्यांच्या सवयीप्रमाणे मोकळेपणाने बोलत होत्या. पोटात एक आणि ओठात दुसरेच असा त्यांच्या स्वभाव नसल्यामुळे अपर्णालाही त्या फार आवडत.

...अपर्णाने मृदू स्वरात विचारले, ''आई तुम्हाला एक विचारू का, रागावणार नाही ना?'' पद्मजाबाईंनी अुलट प्रश्न केला, ''काय विचारणार आहेस एवढं?''

''महत्वाचं आहे माझ्या दृष्टीनं, आई तुम्ही नेहमी कॉटनचीच साडी का नेसता हो? परवा एवढ्या विविध प्रकाराच्या साड्या पाहिल्या दुकानात, ती सिल्कची साडी तर तुमच्या मनात भरली होती खरी, का नाही घेतलीत? साखरपुड्याच्या साडीची घडी का नाही मोडत अजून?''

पद्मजाबाई शांत झाल्या. समुद्राच्या भरती-ओहोटीप्रमाणे त्यांच्या मनातले विचार खळाळत होते. त्यांना वाटले, नको मेली आठवन ती! आठवणीने, सत्याच्या या छायेनें, जीवाला नुसती हुरहुर मात्र लागून राहते, पणं राहवत नाही. आठवण क्षणाचीच असते, चटका एकदाच लागतो. पण पोळलेल्या अंतःकरणाची चुरचुर दिवसभर सरतं नाही. त्यांनी अपर्णाला मोकळेपणी त्यांच्या आयुष्यातला चित्तथरारक प्रसंग सांगितला. जीवघेण्या भाजण्याच्या अपघातातून त्या वाचल्या होत्या. आशुतोषचे नशीब बलवत्तर, त्याला मातृसुख मिळणार होते म्हणूनच त्या वाचल्या. आशुतोष दिड वर्षाचा होता तेव्हा. त्यांच्या लग्नाचा वाढदिवस होता. म्हणून ते बाहेर फिरायला गेले. संध्याकाळी अुशीराच घरी आले. पटकन पायावर पाणी घेतले. आशुतोषला भूक लागली म्हणून तो रडायच्या आत, त्याच्या बाटलीत दूध गरम करून भरण्यासाठी त्यांनी स्टोव्ह पेटविला. आणि अचानक स्टोव्हला जोरात पंप करत असतानाच स्टोव्ह उलटला रॉकेलने पेट घेतला. भडका झाला एकदम बाहेरून आल्यावर घरातली साडी बदलायला ही वेळ झाला नव्हता. अंगावर नेमकी नॉयलॉनची साडी होती. ती चिकटली आणि त्यामुळे खूपच भाजल्या. त्या दिवशी रात्री त्या शुद्धीवर आल्या तेव्हा हॉस्पिटलमध्ये होत्या. ऑक्सिजन लावला होता. पति माधवराव त्यांच्या अुशाशी काळजी करीत बसले होते. पद्मजाबाईंना पाहून त्यांचे मन खूप भरून आले. त्यांना रडू आवरेनासे झाले. त्यांच्या तोंडातून शब्द निघत नव्हता. थोड्या वेळाने ते सावरले, म्हणाले देवाची कृपा म्हणून तू वाचलीस, आता यापुढे कधीही नॉयलॉन, सिफॉन-बिफॉन सिंथेटिक्स् साड्या नेसायच्या नाहीत. फक्त कॉटनची साडी नेसायची! म्हणजे धोका नाही. काय समजलं? डोळ्यांनीच पद्मजाबाईंनी 'हो' म्हटलं,

''नाही, मला वचन दे तसे, नेहमी कॉटनचीच साडी नेसेन.'' ''मी त्यांना तसे वचन दिले. त्यांचे मन जपले, त्यांचे सुख तेच माझे सुख मी मानले. आमच्या संसाराच्या अुन्हाळ्यातही सात्विक प्रीतीच्या वासंतिक वायुलहरी नाचत होत्या. आशुतोष हुषार निघाला. आजन्म नेहमी कॉटनची साडी नेसताना मला अजिबात दुःख होत नाही. अग अपर्णा असं पाहा, आपल्याला नको असलेल्या गोष्टी आपण करत असतो ते आपल्याला अत्यंत प्रिय असलेल्या व्यक्तीला हवं असतं म्हणून. तिचं मन जपणं हाच हेतू असतो. मन कशासाठी जपतो? तर अेकमेकांना आपण हवे असतो आणि हे अेकमेकांना हवं असणं हेच प्रेम आहे. अुद्या मी फक्त तुझ्याकडून अपेक्षा करीत राहिले आणि तुझ्यासाठी काहीच केलं नाही, तुझ्या मनाचा विचार केलाच नाही, तर आपल्यातले हे अेकमेकांना बांधून ठेवणारं प्रेम टिकेल का? शेवटी कोणतेही संबंध एकमेकांना स्वीकारण्यातूनच तयार होतात. एकमेकांच्या भावनांची, विचारांची जपणूक म्हणजे प्रेम. प्रेमाची व्याख्या काय असते गं शेवटी? त्याग, समर्पण हे फारच अुदात्त झालं. प्रेम म्हणजे एकमेकांचा आदर, कदर, एकमेकांबद्दलची जवळीक, आधार, बरंच काही... प्रेमाची व्यख्या सोपी नाही अपर्णा, खरं ना?'' तेजाने आणि सात्विक समाधानाने पद्मजाबाईंचा फुललेला चेहरा अपर्णा न्याहाळीत राहिली. तिला त्या साक्षात् 'देवी' सारख्याच वाटल्या.

...अपर्णानं आईंचा हात हातात घेतला. खूप वेळ थोपटत राहिली ती. पद्मजाबाईंना वाटलं हिला समजलंय आपल मन!

साखरपुड्याच्या पॉलिस्टर साडीची घडी का मोडली नाही याचा उलगडाही तिला झाला. अपर्णा पद्मजाताईंच्या बेडरूममध्ये गेली. तिने कपाट उघडले आणि पॉलिस्टरची साडी हातात घेऊन न बोलता ती निघून गेली - पद्मजाताई तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहात राहिल्या.

♦

• श्री. हेमंत अरुण मराठे (पृ. २१) भ्रमणध्वनी – ९८२२८४७१२०

* कोकणस्थ उपनामे यज्ञसंबधित 'पुरोहितनामे' आहेत. व्यासंग व आस्थापूर्वक केलेल्या संशोधनातून लेखकाने सुमारे तीनशे उपनामांची (यांत काही कऱ्हाडे देशस्थ ब्राह्मणांची ही उपनामे आहेत.) व्युत्पत्ती दिली आहे.
* धर्मप्रसारासाठी बौद्ध त्रिपिटके आवश्यक ठरली. एकेक अक्षर लिहिणे म्हणजे एकेक बुद्धमूर्ती घडविण्यचे पुण्य मिळविणे असे 'सध्दम्मसंग्रह' (पाली) सांगतो. कोकणस्थांनी बुद्धमूर्ती घडविण्याच्या कामीही नाव कमावले. हजार बुद्धमूर्ती घडविणारे ते 'सहस्रबुद्धे!' असो! 'अथवा कुलजातिवर्ण हे आघवेंचि गा अकारण' असे ज्ञानोबांनी केलेले प्रबोधन आपण कधीही विसरता कामा नये.

**काही कुलनामे आणि त्यांची व्युत्पत्ती**

१) अभ्यंकर – अभ्यंगकार – पुरोहितांच्या अभ्यंगस्नानाची तयारी करणारा पुरोहित.

२) आठवले – अध्वरे – अध्वर = यज्ञ. यज्ञकर्ता = यजमान = यजमान = अपभ्रंश

३) आपटे – आपुते – यज्ञसमाझीला 'आपुति' अशी संज्ञा असे यज्ञ संपल्यावर उरलेल्या समिधा व हवनद्रव्ये पवित्र असल्याने त्यांचे नदीप्रवाहामध्ये विसर्जन करणारा पुरोहित = अपभ्रंश

४) उकिडवे – उपज्ञु यज्ञातील कांही मंत्र उकिडवे बसून आणि भूमिका तोंड लावून मंद स्वरात म्हणावयाचे असत. त्यांचे पठण करणारा पुरोहित=अपभ्रंश

५) उपाध्ये – उप+अध्याय पूर्वकाळी यजमान स्वतःच वेदमंत्र म्हणणारे असत. राजमान याचा अर्थच यजनकार = यज्ञकार परंतु समंत्रक हवनामध्ये त्याला आवश्यकता पडण्यास सहाय्य करणारा पुरोहित. पुढे बसणारा किंवा जवळ नसणारा या अर्थाचे हे उपनाम.

६) ओगले – उवथ्यकार सोमयागाच्या प्रारंभी उक्थ्य नावाचे समवेदातील मंत्र म्हणणारा पुरोहित.

७) करंदीकर – करंडकार = खड्ग. या शस्त्राने यज्ञरक्षण करणारा पुरोहित. अपभ्रंश = करंदीकर. करंड = करंद = करंदीकर.

८) काणे – कर्णमणी = भिकबळी. हा मोत्याने युक्त असा सुवर्णलंकार दक्षिणा म्हणून मिळालेला पुरोहित. वेदशास्त्र संपन्न पंडिताना याचा अधिकार असे नंतरच्या काळात श्रीमंतीचे लक्षण म्हणून हा अलंकार वापरला जाई. कानबिंदु हे उपनाम याच अर्थाचे आहे. (कानविंदे)

९) कार्लेकर – कार्ले येथील संग्रामात वीरमरण आलेला (पावलेला) योद्धा.

१०) काले – घटिकपत्रानं मुहूर्ताचा काळ सांगणारा पुरोहित.

११) केळकर – यज्ञमंपासाठी केळीची तोरणे बांधणारा पुरोहित. केळीचे खांब पुरविणारा.

१२) खरे – सोमरसाची पात्रे तीन दगडांच्या आधाराने ठेवीत. त्या दगडांना 'खर' (खला) अशी संज्ञा असे. त्या सोमपाबांची रक्षणव्यवस्था करणारा पुरोहित. 'धोंडे' हे उपनाम वरील अर्थानेच रूढ झाले.

१३) गाडगीळ – घृतक्षीर = यज्ञकुंडात अग्नीग दूध समणि करणारा पुरोहित, अपभ्रशं. विदर्भात गोरसघाटे, गोडघाटे असे देशस्थ उपनाम आहे.

१४) गोखले – गोकुले = गोकुल म्हणजे गायींचा समुदाय यज्ञात गायी दक्षिणा म्हणून देत असत. त्यांचा सांभाळ करणारा पुरोहित.

१५) गोगटे – गोघृते. गाईचे तूप व तुपात घोळलेल्या समिधा तयार करणारा पुरोहित.

१६) गोडसे – 'गोरस' म्हणजे दूध ते हवनासाठी वापरले जाई त्याची व्यवस्था करणारा पुरोहित. अपभ्रंश र = ड.

१७) गोरे – गोरस म्हणजे दूध. ते अग्निसमर्पण करणारा पुरोहित.

१८) घाटे – घटीसंबंधित घटिपात्राने यज्ञविधीचा मुहूर्त ठरवीत. त्याची व्यवस्था करणारा पुरोहित/घटाने अग्निला दूध वाहणारो पुरोहित.

१९) घारपुरे – गार्हपत्य – गार्हपत्त्ये = घरगुती हवन सकाळ, व संध्याकाळ प्रतिदिवशी करणारा यजमान. अपभ्रंश.

२०) जोशी – ज्योतिषी. ग्रहांचया स्थितीवरून मुहूर्त सांगणारा पुरोहित.

२१) ताम्हनकर – तांब्याच्या ताम्हनामध्ये हवनद्रव्य ठेवून अग्निसमर्पण करणार पुरोहित.

२२) दांडेकर – 'दंड' ही वेदपठणाच्या दहा पद्धतींपैकी एक त्याचा ज्ञात पुरोहित (अपभ्रंश) ह्या घराण्याने अग्निष्टोम– ह्या सोमयज्ञाचा अपभ्रंश.

२३) दातार – दृष्टा = दृष्टकार. यज्ञकार्यावर सतत दृष्टी ठेवून ते व्यवस्थित पणे चालले आहे असे पाहणारा पुरोहित. आंध्रात याच अर्थाच 'उपदृष्टा' हे आडनाव आहे. दाते हे उपनाम वरील अर्थाचेच आहे.

२४) दीक्षित – सोमयज्ञाची दीक्षा घेतलेला पुरोहित.

२५) देवधर – देव+आराधक एखाद्या प्रसिद्ध देवळामध्ये पूजा–अर्चा करणारा पुरोहित.

२६) दामले – दामकर. दम = दावे साखळदंड यज्ञाय अश्वाच्या दोन्ही बाजूना बाळीव व हिंस्र पशू मंडपशोभेसावी बांधीत. पशुबंधनाची व्यवस्था करणारा पुरोति.

२७) नेने – नेष्ट = नेता = ललकारी देऊन यजमान पत्नीला मंडपात नेणारा पुरोहित = अपभ्रंश

२८) पटवर्धन – वेदपठणाच्या दहा पद्धतीं पैकी 'पद' ह्या पद्धतीने वेदपठण करणारा पुरोहित.

२९) परांजपे – ज्याने चार सोमयज्ञ केले त्या सोमयागाला प्रति प्रजापती अशी पदवी असे त्यावरून प्राजा पत्ये = परांजपे

३०) पाटणकर – उपस्थाने = पूजा यज्ञारंभी यज्ञपूजेची व्यवस्था करणारा पुरोहित = उपस्थानकर

३१) फडके – 'पंद' ह्या वेदपठणपद्धतीने म्हणजे प्रत्येक शब्द वेगवेगळा करून वेद म्हणणे. पद पद्धतीने वेद म्हणणारा = अपभ्रंश पदके = फडके

३२) फाटक – पदकार पद पद्धतीने वेदपठण कराणारा पुरोहित.

३३) बर्वे – यज्ञभूमीवर भराव टाकून ती समतल म्हणजे सपाट करणारा पुरोहित.

३४) बापट – यज्ञात बोकडाची वपा म्हणजे जठरातील चिवढ असे आवरण रक्त न सांडता सोलून काढणारा. (वपावत = बापट)

३५) बोडस – पुरोडाश = पराठ्यासारखे थोडे गोड असे पक्वान्न यज्ञात हवन केले जाई. त्याची व्यवस्था करणारा पुरोहित.

३६) भट – वेदविद्वानांना 'भट्ट' अशी पदवी असे. पदवीधारक पुरोहित.

३७) भिडे – 'उद्‌भिदे' नावाच्या यज्ञात कोमटं दुधाला ताकाचे विरजण लावून–दही बनवून ते अग्निसमर्पण करीत. ही व्यवस्था करणारा पुरोहित.

३८) मराठे – वाजपेय यज्ञाच्या यजमानाला सम्राट ही पदवी असे सम्राटे = मराठे (अपभ्रंश)

३९) मेहेंदळे – महेंद्रकार = सोमयागा प्रारंभीच्या इष्टी (होम) च कर्ता–पुरोहित. (अपभ्रंश)

४०) रानडे – रण = संग्राम–संग्रामवीर = रणकारे–अपभ्रंश– रानडे, राणे.

४१) लेले – लेपकारे–पुरोहिताना धुराचा त्रास होऊ नये म्हणून अंजन व्यवस्था करणारे.

४२) वेलणकर – वरूण ह्या जलाशय (सागर) देवतेसाठी होमहवन करणारा पुरोहित.

४३) वैशंपायन – महर्षी व्यासाचा प्रमुख सहाय्यक– महाभारतकार–पुराणकथन कराणारा.

♦

## शैक्षणिक पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांची सूची - २०१९

| अनु | नाव | विद्यापीठ/मंडळ | परिक्षा | गुण | पैकी | टक्के | पारितोषिक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | शुभंकर मिलिंद आपटे | टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस | M.A. | | | Grade 6.8 | 1500 |
| 2. | श्रिया प्रदीप मराठे | गोवा राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ | 12वी | 506 | 600 | 84.33% | 800 |
| 3. | युग अतुल अभ्यंकर | C. B.S.E. | 10वी | 450 | 500 | 90.00% | 800 |
| | | | अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक | | | | 500 |
| | | | कै. सौ. माधुरी प्रमोद मराठे स्मृती पारितोषिक | | | | 450 |
| 4. | मृदुला विश्वेश मराठे | महाराजा सयाजीराव युनिव्हर्सिटी, बडोदा, गुजरात M.A. (म्युझिऑलॉजी) | M.A. | | | 8.14 | 1500 |

# नाबाद अर्धशतक

• सौ. नीलांबरी रमेश मराठे (पृ. २८०) भ्रमणध्वनी – ९४०४२४१७६१

'हितगुज'च्या प्रत्येक अंकामध्ये हेमंत कुलबांधवांशी संवाद साधत असतो. खूप छान वाटते. या अंकात त्याने मुलामुलींच्या लग्नाचा विषय प्रकर्षाने मांडला आहे. हल्ली मुलांची लग्न जमत नाहीत अशी खंत व्यक्त केली आहे. त्यावर त्याने वाचकांची मते मागितली आहेत म्हणून माझे निरीक्षण व अनुभवातून माझी काही मते व्यक्त करीत आहे. मी व्यक्त केलेले विचार सर्वच मुलामुलींच्या बाबतीत लागू पडत नाही. पण अनेकांच्या बाबतीत जे जाणवते ते व्यक्त करत आहे. सर्वच नियमांना अपवाद असतात हे प्रामुख्याने प्रथम लक्षात घ्यावे व कृपया गैरसमज करून घेऊ नये असे प्रारंभीच नमूद करते.

सध्या मुलामुलींची लग्न लवकर जमत नाहीत. वयाच्या मानाने खूप उशीर होतो. लग्न जमलीच तर फारशी टिकत नाहीत अशी वस्तुस्थिती आहे. या परिस्थितीला मुख्यत्वे मुलींचे आर्थिक स्वातंत्र्य कारणीभूत आहे असे जाणवते. मुलगी उच्च शिक्षित होऊन चांगल्या पगारावर नोकरी करतात ही गोष्ट चांगली आहे. परंतु दोघेही चांगले पैसे कमावतात त्यामुळे एकमेकांवर अवलंबून नसतात. ह्यामुळे एकमेकांशी जुळवून घेण्याची ॲडजेस्टमेंट करण्याची वृत्ती खूप कमी झाली आहे असे जाणवते. प्रत्येकाचा इगो – मी पणा – हा खूप उच्च प्रतीचा असतो. त्यामुळे दोघांपैकी कोणीच नमते घ्यायला तयार नसतो. कारण पैशाचा जोर. सध्या माणसांपेक्षा पैशाला अवास्तव महत्त्व आले आहे.

दुसरे म्हणजे लग्न टिकत नाहीत. घटस्फोट होतात. हल्ली घटस्फोटाचे प्रमाण खूप वाढलेले आहे असे दिसून येते. याला बऱ्याच वेळा मुलींच्या आया जबाबदार असल्याचे दिसून येते. मुलीच्या संसारात लुडबूड करून काही आया नको तेवढे लक्ष मुलीच्या संसारात घालून तिला नकळत काही गोष्टी शिकवतात. मुलीला सासरची माणसे कितीही सहकार्य करत असली तरी आईने सांगितलेलेच पटते त्यामुळे तिची सासरच्या माणसांकडे पाहण्याची वृत्ती नकारात्मक होते. आणि तेव्हाच संसारात ठिणगी पडायला सुरुवात होते. एकदा ठिणगी पडल्यावर जाळ वाढायला वेळ लागत नाही. अशा वेळेस मुलींना नवऱ्याचे आईवडील व इतर सासरची माणसे नको असतात. पण माहेरच्या माणसांचा मुख्यत्वे आईवडीलांचा राबता मात्र मुलीच्या घरी चालू असतो. इथे मुलांची अवस्था मात्र कात्रीत सापडल्यासारखी होते. पण तो स्पष्टपणे बोलू शकत नाही. पण अशा परिस्थितीत मुलाने स्पष्टपणे सांगायची हिंमत दाखवली पाहिजे की जर तुला माझे आईवडील नको असतील तर तु तुझ्याही आईवडीलांशी संबंध ठेवता कामा नये. तुला माझे आईवडील नको आहेत तर मीही तुझे आईवडील स्वीकारणार नाही. पण दुर्दैवाने असे होताना दिसत नाही.

सर्वच पालकांनी मुलांना लहानाचे मोठे करताना अनेक खस्ता खाल्लेल्या असतात. अनेक वेळा मुलांसाठी त्याग केलेला असतो. एक आईवडील ३–४ मुले (आमच्या काळात असायचे आता एकच मुल असते ही गोष्ट वेगळी आहे) सांभाळायची. पण ३–४ मुले मिळून आईवडील सांभाळू शकत नाहीत. ३ मुले असतील तर प्रत्येकाकडे ४ महिने राहण्याची वेळ येते. पण त्यात मायेचा ओलावा नसतो. नाईलाज असतो परदेशी असलेल्या मुलांचे प्रश्न आणखीनच वेगळे असतात.

भोवताली पहात असलेल्या अनुभवातून एवढेच सांगावेसे वाटते की आताच्या लग्नात मुलामुलींनी लक्षात घ्यावे की पैसा हे सर्वस्व नाही. पैशापेक्षा माया, प्रेम, जिव्हाळा, आपुलकी आणि एकमेकांबद्दल आदर व्यक्त करणे हे जास्त महत्त्वाचे आहे.

लग्नानंतर नवराबायको ही गाडीची दोन चाके आहेत. दोन्ही चाके व्यवस्थित असतील तरच संसाराची गाडी योग्य दिशेने धावू शकते.

स्वातंत्र्य जरूर असावे पण स्वातंत्र्याचा गैरफायदा घेऊ नये. हल्ली मुले मुली एकत्र काम करतात. त्यामुळे सहवास वाढतो. लग्नानंतर इतर मित्रमैत्रिणींशी मैत्री जरूर असावी पण त्या मैत्रीला मर्यादा असाव्यात. नाहीतर इतरांकडे केव्हा ओढले जाल हे नकळत तुम्हालाही कळणार नाही. असे होऊ नये म्हणून नवरा बायकोने एकमेकांबद्दल विश्वास आणि प्रेमाने राहण्याची गरज आहे.

♦

## हसरे हितगुज



**दार्जिलिंगचा चहा**

स्वाती : अरे वा! चहा दार्जिलिंगचा दिसतोय मानसी!

मानसी : अग, तू कसं ओळखलंस?

स्वाती : नाही ग, चहा अगदी थंडगार आहे म्हणून म्हटलं!

# बंदी विद्याधर कदम

◆ अच्युत म. चक्रदेव (पृ. ७३२), पुणे

सुमारे १९७४-७५ ची ही कथा. त्यावेळी मी येरवडा म.कारागृह येथे 'उपहार गृह- तुरुंगाधिकारी' म्हणून कार्यरत होतो.

बंदीना, शासकीय, खर्चाने चहा दिला जात नाही. शासकीय खर्चाने तांदुळांचे कण्यांची ''कांजी'' दिली जाते. क्वचित ज्वारीचीही कांजी असते. बंदीना 'चहा' मात्र त्यांचे पैशाने म्हणजे कुपनवर दिला जातो. तरीही जवळ, जवळ ३०००-४००० कप चहा करावा लागतो. ही सर्व जबाबदारी बंदी- विद्याधर कदम या बंदीने त्यावेळी घेतलेली होती. त्यासाठी त्याला पहाटे ३-४ वाजता उठावे लागे.

त्यावेळी लागणाऱ्या चहा, दूध पाणी मोठे हंडे, इ.वस्तूंची जुंपणी तो आधी रात्रीच करून ठेवत असे.

न्याहारी, कांदा पोहे, शिरा, सांजा, कारागृहाचे बेकरीचीच बिस्कीटे, पाव, खारी ही, ही व्यवस्था तोच करीत असे. हे सगळे करून चहाचे गाड्यावर ते एक दोघांचे मदतीने चढवणे, चहाची मापे देणे ही, ही व्यवस्था विद्याधर करत असे.

त्या शिवाय शाकाहारी, मांसाहारी पदार्थांची मागणीप्रमाणे 'पुरवठा' या तंत्राने तो करीत असे.

विद्याधर हा 'सांगली जिल्ह्यातील' 'नांद्रे' गांवचा. बांधावरून झालेल्या मारामारीत त्याचे हातून भावकीतीलच एका भावाचा खून झाला होता. त्यासाठी त्याला 'जन्मठेप' झाली होती. शिक्षण मराठी सातवी 'पूर्वीचे फायनल' झाले होते. गावात असाताना गावचे एस्. टी. कँटीनमध्ये केलेले काम हेच त्याचे अनुभवाचे बळ.

याच अनुभवाचे शिदोरीवर तो कारागृहाचा ''बल्लवाचार्य'' झाला होता.

'चांगली वागणूक' म्हणून तो दोन वर्ष आधी सुटला.

तेवढी त्याला शिक्षेंत सूट मिळाली आहे.

गांवाकडे त्याने आता नवजीवन मंडळाचे मदतीने अुपहारगृह सुरू केले आहे. येथून सांगली शहारात मोठे अुपहारगृह चालवायचा त्याचा विचार आहे. त्याला नक्कीच प्रचंड पाठींबा मिळेल, त्याबद्दल माझ्या मनात बिलकुल संशय नाही. ◆

# वाचकांचा पत्रव्यवहार

डॉ. सौ. सुमेधाताईंना
सौ. निलांबरीचा आदरपूर्वक नमस्कार.

नुकताच जून १९ चा हितगुजचा अंक मिळाला. तुम्ही संपादित केलेल्या हा ५० वा अंक आहे. हे वाचून खूपच आनंद झाला नाबाद अर्धशतक तुम्ही झळकावलेत. एकेकाळी हितगुज बंद पडायची वेळ आली होती. पण त्यावेळी कै. लक्ष्मणरावांनी पुढाकार घेऊन त्याला जीवनदान दिले. त्यांनी जोमाने आणि नेटाने पुन्हा हितगुजचे अंक नियमितपणे काढले २००६ सालापासून हितगुजच्या संपादनाची जबाबदारी लक्ष्मणराव, म.प्र. मधील सर्व जेष्ठ आणि श्रेष्ठ व्यक्तिंनी तुमच्यावर टाकली आणि माझ्या सारख्या सामान्य कुलबंधू भगिनींनी, सुमेधाताई ही जबाबदारी समर्थपणे पेलू शकतील असा विश्वास व्यक्त केला होता. तो विश्वास आज सार्थ आल्याचे समाधान नक्कीच वाटत आहे. तुम्ही आजतागायत हितगुजची जबाबदारी अखंडपणे व समर्थपणे पार पाडत आहात याबद्दल तुमचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. 'हितगुज' दिवसेंदिवस वाचनीय होत आहे. प्रत्येक अंक यशाची एकेक पायरी चढत आहे असे जाणवते. 'हितगुज'मधील सर्वच मजकूर वाचनीय असतो. तुमची निरपेक्ष वृत्ती प्रामाणिक प्रयत्न आणि चिकाटी यामुळे 'हितगुज'चे यापुढील अंकही अधिकाधिक दर्जेदार निघतील याची खात्री आहे आणि तुमच्याकडून 'हितगुज'च्या ५००व्या अंकाचे संपादन होऊन त्याचे दिमाखदार प्रकाशन होईल असा मनापासून विश्वास वाटतो. 'हितगुज'च्या ५०व्या अंकाबद्दल तुमचे मनःपूर्वक अभिनंदन आणि 'हितगुज'च्या पुढील वाटचालीसाठी तुम्हाला मनापासून शुभेच्छा!

---

मी अरुण मोरेश्वर मराठे, असो कळवितो, मी स्वतः मॉडेल आर्ट इन्स्टिट्यूट दादर येथे प्राचार्य होतो. मी २००५ मध्ये निवृत्त झालो पेंटींग करणे हा माझा व्यवसाय. माझी, पारनाका वसई (प.) जि. पालघर येथे 'मराठे आर्ट गॅलरी सुरू केली. त्याला ७-८ वर्षे झाली. परंतु आता ती नव्याने मुंबईच्या आर्ट गॅलरीसारखे स्वरूप दिले. ते लोकसत्ता दि. ९ सप्टेंबर २०१७ शनिवारी प्रसिद्ध झाले. त्याचा फोटो पेपरमधील पाठवित आहे.

कळावे

आपला विश्वासू
**अरुण मो. मराठे** (९४२१६२८६०८)

# चिंतन मुक्तपीठ

• श्री. वा. ग. मराठे, (पृ.५०३),पुणे भ्रमणध्वनी – ९९२२०४८४२३

*आम्ही इकडे आहोत पाहुणे ।*
*पाहायाचे नाही काही उणे पुणे ।।*
*ठेवायाचे नाही कुणाचे देणे ।*
*मात्र द्यायाचे एकमेकां खांदा देणे।।*
*निश्चल मनाने हुंदका आवरून ।*
*पाऊल टाकावे स्मशानाचे भान राखुन ।।*

आपण रुग्णालयात जातो, केसपेपर काढतो. सर्व सोपस्कार होतात. सगे सोयरे येतात जातात, भेटण्याची वेळ संपते. पुन्हा 'आपण एकटे-एकटे, अंधार सोबती, खरोखर उद्या आपण असू का?' हा विचार कुठल्याही पेशंटच्या मनात डोकावतो ना? नसल्यास जरा अंतर्मुख होऊन विचार करा अन् काय वाटते ते पहा!

ह्या जगात येणारे सर्व जीव किडे, मुंगळे, पशु पक्षी ते सगळेच वळवळणारे किडे असतात. कोणी शेणात बनतात तर कोणी गटारात फरक एवढाच की कुणाला सावली मिळते तर कुणाला रखरखीत उन्हाळा.

सगळ्याच म्हाताऱ्यांना टक्कल नसते व म्हणून का कुणाला अक्कल नसते परंतु अक्कल हुषारीने ते आपापाली कामे बहुतेक लोक पार पाडत असतात. जरी ते किरकोळ वाटत असले तरी शक्तिपेक्षा युक्तीनेच आपले कार्यक्रम पार पाडत असतात. फरक एवढाच की ते संयमाने, शिस्तीने, विचारपूर्वक व्यूह रचून व अनुभव संपन्न असल्याने बोटे मोडून गणिते मांडतात व आपले उत्तर बरोबर शोधतात. पण नवी पिढी बटणाने सर्वच व्यवहार करतात.

भाकरी ही आईच करूं शकते आणि पिझ्झा मुलगी! न करता मशीन (ओव्हन) बनवू शकते. नवीन पिढी भाकरी चावू शकणार नाही. कारण त्यांना दांत येण्यापूर्वीपासून आईस्क्रीम चावायची सवय असते. आम्ही सर्वांवर संस्कार केलेले असतात. त्या संस्काराची मुळे वडा पिंपळासारखी खोलवर गेलेली असतात व त्यावरच आपण तग धरून राहातो. म्हणूनच म्हणतो आपण १ तारखेला सकाळी वही पूजन करून ''दैनंदिनी'' लिहायला, दैनिक कार्यक्रम लिहायला सुरुवात करुं या! ती दैनंदिनी कशी काय लिहिणार? थांबा... जरासं डोकं खाजवा. विचार करा. पेन्सिल रबर पेन घ्या. लाल पेन्सिल, मार्कर घ्या एका पेपरवर स्केच करा, साधक बाधक विचार करा, काय लिहावयाचे ते पूर्ण विचारांती ठरवा कारण आपला शत्रु ''स्मरण शक्ती'' होय. म्हातारपणी काठी आधार देते आणि स्मरणशक्ती दगा देते. त्याला दूर ठेवायचे असेल तर आपण दैनंदिनीचे अस्त्र जवळ ठेवणे अगत्याचे आहे. हे विसरू नका. ती जवळ ठेवा, जिवा पलिकडे जपा व नियमानें गोळी सारखी चघळत बसा.

आता दिवसाचा कार्यक्रम

प्रार्थना, आन्हिक कर्म, प्रभातफेरी, नाश्ता, कौटुंबिक विचारपुस, पेपर वाचन, शिक्षण, जेवण, औषधी पाणी, पेन्शनर, बँकींग, प्रवास (गमती जमती) अनुभव बरे वाईट, आपले स्थान, संध्याकाळचे फिरणे, व्यायाम, रात्रीचे मित भोजन, दैनंदिनी लिहिणे, प्रार्थना ''Good Night''

आपण जेव्हा झोपून उठू त्यावेळेपासून कार्यक्रम घड्याळाच्या तासाप्रमाणे उपक्रम आखावा. रात्री दैनंदिनी लिहून नवीन नोंद ठेवावी आणि रात्रौ ११ वाजता परमेश्वराची प्रार्थना करून ''उद्या मी असेन –

किंवा नसेन

म्हणून प्रेमपूर्वक त्या जगनियंत्याला नमस्कार करून GOOD NIGHT म्हणावे.

असा प्रत्येक दिवस घालवावा. अशा प्रत्येक क्षणाला, घरात, कुटुंबात, समाजात बरे वाईट प्रसंग येत असतात व त्यातून आपण शेवटपर्यंत शिकत असतो. कारण क्षणाक्षणाला बुकींगची लाईन पुढे सरकत असते. घड्याळाचे काटे फिरत असतात. आपली मेडिकल फाईल आपल्या उशाजवळ, दैनंदिनी जवळच ठेवावी. समोर भिंतीवरचे घड्याळ दिसते. त्याची टिकटिक व आपल्या हृदयाची टिक टिक हीच खरी सोबत असते. शेवट घड्याळच आपला साक्षीदार असते. हे विसरू नका. ♦

## चुकीची दुरुस्ती

'हितगुज' जून २०१९च्या अंकात पृ.२ वर श्री. कालिदास मराठे यांनी त्यांचा नातू चि. शार्दुल याच्या मुंजीप्रित्यर्थ विज्ञापन दिले होते. त्यात **प्रेरणा पूर्वजांची व प्रेरणा देणाऱ्याचे स्मरण हे कुटुंबाचे संजीवन** अशी शब्दरचना हवी होती क्षमस्व. चुकून **प्रेरणा देणाऱ्यांचे विस्मरण** असे छापले गेले.

## श्री. कालिदास मराठे, गोवा

१९८० साली जेव्हा कलकत्त्याच्या ना.बा. आणि पुण्याच्या वा.ग. मराठे यांची बडोद्याच्या बृहन्महाराष्ट्र मंडळात गाठ पडली तेव्हा मराठे प्रतिष्ठानच्या स्थापनेचे बीज रुजले. संस्थेच्या स्थापनेसाठी जरुरी असलेला राजाश्रय मराठे उद्योगच्या सुरेशभाऊ यांच्या रुपात मिळाला. लक्ष्मीसह सरस्वती भेटली कालिदासजींच्या रुपात. ना.बांच्या ओळखीतील गोव्यातील ही शिक्षणक्षेत्रातील नामदार व्यक्ती... प्रतिष्ठानच्या स्थापनेसंदर्भात औपचारिक बोलणी सुरू झाल्यापासूनच हे सर्व एकमेकांच्या संपर्कात होते. प्रतिष्ठानची मुहूर्तमेढ जानेवारी १९८० मध्ये मुळगाव व वेळगे येथील मराठ्यांच्या निवासस्थानी होऊन शेवटी ऑक्टोबर ८० मध्ये घटना निश्चित झाली व हा न्यास जानेवारी १९८१ मध्ये धर्मादाय आयुक्त कार्यालयात नोंदीत झाला.

गोव्यातील पाळी येथे जन्मलेल्या कालीदासजींचे शिक्षण नांदेड व पणजी येथे झाले. १९६६ साली B.Sc. तर १९६८ साली B.Ed. पदव्या प्राप्त केल्यावर आपल्या शिक्षकी पेशाला सुरुवात केली. त्यानंतर १९७१ साली एम.एड तर १९७२ साली बंगाली भाषेची पदविका प्राप्त केली. तर १९७८ साली एम.ए. पदवी प्राप्त करीत, मुख्याध्यापक, तालुका शिक्षण अधिकारी, पर्यावरण शिक्षणाधिकारी, गोवा माध्यमिक उच्चमाध्यमिक शिक्षण मंडळात प्रथम सहाय्यक संचालक मग उप संचालक, कार्यवाह व संचालक अशी पदोन्नती घेत राज्य शिक्षण संस्थेच्या संचालक पदावरून २००० साली स्वेच्छानिवृत्ती घेतली. शैक्षणिक क्षेत्राशी संबंध असल्याने अफाट वाचनाबरोबरच विपुल लेखनही झाले. यांची ५ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. स्वेच्छा निवृत्ती नंतर वाचक सल्लागार समितीची स्थापना केली. गोमंतक बालशिक्षण परिषदेचे संचालक पद भूषविले. गोमंतक, महाराष्ट्र टाइम्स, नवप्रभा, लोकसत्ता यासारख्या दर्जेदार वृत्तपत्रांत विपुल लेखन केले आहे. आकाशवाणीवरून त्यांची अनेक भाषणे प्रसारित झाली आहेत.

प्रतिष्ठानच्या स्थापनेतच नव्हे तर १९८६ व २००५ साली गोव्यात झालेल्या अखिल भारतीय मराठे कुलसंमेलनाच्या आयोजनात तसेच व्यवस्थापनात त्यांचा सिंहाचा वाटा होता. प्रतिष्ठानच्या प्रत्येक कुलसंमेलनास उपस्थित राहणारे ते कदाचित एकमेव व्यक्ती असतील. आजही 'गोमंतक मराठे परिवार' या संस्थेद्वारे गोमंतकातील मराठे मंडळींची मोट बांधून ठेवण्याचे महत्कार्य त्यांनी चालू ठेवले आहे. प्रतिष्ठानच्या स्थापनेपासून आजतागायत प्रतिष्ठानच्या सुखदुःखाच्या प्रसंगी त्यांचे आशीर्वाद नेहमीच आमच्या पाठीशी राहिले आहेत. त्यांना हा जीवन गौरव पुरस्कार देतांना हा आमचाच सन्मान आहे असं आम्ही समजतो.

## डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे, मुंबई

आपल्या मराठे प्रतिष्ठानचे मुखपत्र 'हितगुज' म्हणजे डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे हे समीकरण आता सर्वांनाच ज्ञात आहे. कै. लक्ष्मण शंकर मराठे यांनी २००६ मध्ये संपादक पदाची सूत्रे खाली ठेवण्याची घोषणा केली. काही दिवस तात्पुरती उपाययोजना म्हणून सध्याचे अध्यक्ष श्री. सी.गो. खांबेटे यांनी काम पाहिले. पण त्यानंतर संपादकत्वाची जबाबदारी पेलण्यास लायक व्यक्तीचा शोध फार काळ घ्यावा लागला नाही. 'प्राचीन मराठी वाङ्मयातील दत्तोपासना : एक विवेचनात्मक अभ्यास' असा तगडा विषय घेऊन Ph.D. केलेल्या सुमेधाताईंनी विचारणा झाल्यावर लगेचच होकार दिला आणि 'हितगुज' पोरकं होण्यापासून वाचलं.

पूर्वाश्रमीच्या सुमेधा केशव भातखंडे १९८१ साली प्रतिष्ठानचे माजी कोषाध्यक्ष श्री. प्रभाकर मराठे यांच्याशी विवाह करून मराठे झाल्या. विवाहानंतर ८ वर्षांनी संसार सांभाळून Doctorate मिळवली. सावरकर या हिंदूंच्या दैवतावर अपार श्रद्धा असल्याने हिंदू महासभेचे सर्वेसर्वा आणि सावरकरांचे बंधू नारायणराव सावरकर यांचे चिरंजीव विक्रम सावरकर यांच्या संपादकत्वाखाली निघणाऱ्या 'प्रज्वलंत' साप्ताहिकाच्या सहाय्यक संपादिका म्हणून एक तप साधना केली. याकाळात प्रज्वलंत मासिक झाल्यावर त्या अंकांत तसेच विशेषांक, दिवाळी अंक आदी मध्ये त्यांचे लेख, कथा, समीक्षा, मुलाखती असं विविध प्रकारचं साहित्य प्रकाशित होत असे. **'दैनिक सकाळ'** मध्ये त्यांचे लेख, पुस्तक परिचय, समीक्षात्मक लेख कथा असे विविध प्रकारचे साहित्य प्रकाशित होत असे. मराठी साहित्याचा एक विशेष म्हणजे दिवाळी अंक. दिवाळी अंकांमधून त्यांच्या साहित्यास प्रसिद्धी मिळत असे. तसेच आकाशवाणी मुंबई केंद्रावरून त्यांचे काही कार्यक्रम अधून

मधून प्रसारित होत असतात. साहित्यविषयक विविध स्पर्धा तसेच निबंध स्पर्धांमध्ये परीक्षक म्हणून देखील त्या काम पाहतात.

साहित्याच्या जोडीलाच सामाजिक कार्यातही त्या अग्रेसर आहेत. सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. पु.भा. भावे उर्फ भावे अण्णा यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ स्थापन झालेल्या भावे स्मृती समितीच्या उपाध्यक्षा म्हणून देखील ५/६ वर्षे काम पाहिले. विक्रम सावरकर संचालित मुरबाड येथील 'महाराष्ट्र मिलिटरी स्कूल' च्या त्या एक विश्वस्त आहेत. या शाळेच्या स्थापनेपासून म्हणजे १९९२ सालापासून या संस्थेमध्ये त्या कोणत्या ना कोणत्या स्वरुपात कार्यरत आहेत. सध्या दादर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक या संस्थेच्या सहकार्यवाह म्हणून काम पाहतात. हितगुज या आपल्या मुखपत्राच्या संपादिका ही त्यांची ओळख हितगुजच्या ६८व्या अंकापासुनची. त्यानंतर ७५ आणि १०० वे दिमाखदार अंक त्यांच्याच संपादकत्वाखाली प्रसिद्ध झाले. नुकताच प्रकाशित झालेला ११८वा जूनचा अंक त्यांचा ५१वा. या सर्व जबाबदाऱ्या त्यांनी समाजकार्य म्हणून निरलसपणे, स्वेच्छेने आणि विनामोबदला पार पडल्या आहेत याचे विशेष कौतुक. प्रतिष्ठानचे तत्कालीन अध्यक्ष श्री. आनंदराव यांनी हितगुजच्या स्वरुपात हवे ते आणि जरूर वाटणारे बदल करण्यास पूर्ण मुभा दिल्यावर त्यांची प्रतिभा खरी बहरास आली. हितगुजच्या सध्याच्या आकर्षक स्वरूपाचे श्रेय हे सर्वस्वी त्यांचेच आहे. हितगुज आणि सुमेधाताई हे जणू समानार्थी शब्दच झाले आहेत. त्यामुळे हितगुज हे जणू त्यांचे तिसरे अपत्यच आहे असं म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

अशा या 'हितगुज'कर्त्या, सनातन वृत्तीच्या, सरस्वतीदेवीचा वरदहस्त लाभलेल्या आमच्या सुमेधाताई या विदुषीना हा पुरस्कार देतांना आम्हाला धन्यता वाटत आहे.

## सौ. निलांबरी मराठे, पुणे

आज ६५ वर्षे वयाच्या असलेल्या सौ. निलांबरी रमेश मराठे या प्रतिष्ठानच्या पुणे शाखेच्या स्थापनेनंतर सुमारे ७/८ वर्षात प्रतिष्ठानशी निगडीत झाल्या त्या आजपर्यंत. मानसशास्त्रातील M.A., M.Ed. असलेल्या निलांबरीताई त्यानंतर पुण्याच्या ज्ञानप्रबोधिनी सारख्या प्रथितयश संस्थेत मानसशास्त्र विभागात १० वर्षे कार्यरत होत्या. त्यानंतर 'व्यंकटेश मार्गदर्शन केंद्र' ही संस्था स्थापन करून त्याद्वारे मानसशास्त्रीय चाचण्यांद्वारे व Attitude टेस्ट द्वारे विद्यार्थ्यांना व्यवसाय निवडीचे मार्गदर्शन देण्याचे उपक्रम त्यांनी राबवले. या केंद्रात त्यांनी आजपर्यंत हजारो विद्यार्थ्यांच्या Attitude Test करून अनेकांसाठी यशाची दारे खुली करून दिली आहेत. याखेरीज मानसशास्त्रीय विषयांवर त्यांनी विपुल लेखन केले आहे जे अनेक साप्ताहिकांतून आणि मासिकांतून प्रसिद्ध झाले आहे. या विषयातील तज्ज्ञ या नात्याने अनेक चर्चा व मुलाखती यांतही त्यांचा सहभाग असे.

अशा प्रकारे व्यावसायिक यशाची एकेक पायरी चढतांनाच त्या प्रतिष्ठानचे श्री. वामनअण्णा (कुमुदताईंचे पिताश्री) व अरुणराव (ज्यांचा मागील वर्षी सत्कार केला होता) यांच्या संपर्कात आल्या. त्यानंतर मराठ्यांच्या या सासुरवाशिणीची नाळ जी प्रतिष्ठानाशी जोडली गेली ती कायमचीच.

पुणे शाखेचा कारभार त्यांनी जवळ जवळ २५/३० वर्षे सांभाळला. त्यांच्या या कार्यकाळात त्यांनी दोन कुलसंमेलने आयोजित करून यशस्वी करून दाखवली. त्यांचे संघटन कौशल्य केवळ इथवरच सीमित नव्हते तर इतर ठिकाणी झालेल्या दोन संमेलनासाठी पुण्यातील इच्छुक मंडळीना त्या त्या ठिकाणी बसने नेऊन त्यांची व्यवस्थित बडदास्त राखून सुखरूप परत आणणे यांत त्यांच्या संघटन, नियोजन व व्यवस्थापन कौशल्याची प्रचीती त्यांनी आणून दिली. 'वधूवर सूचक मंडळ' असणे ही त्या काळाची गरज होती. हे ओळखून, प्रतिष्ठानतर्फे वधूवर सूचक मंडळ सुरू करून त्याचा लाभ मराठे कुटुंबातील तसेच इतर चित्पावन गरजू मंडळीना मिळवून देण्याचे महत्कार्य देखील त्यांनी केले. डायरी लिहिणे हा त्याकाळी बऱ्याच जणांचा छंद म्हणा किंवा उपक्रम असे. हे जाणून, प्रतिष्ठान तर्फे डायरी छापून घेऊन त्यातील पृष्ठे मराठे मंडळीनी पुरस्कृत करून त्याद्वारे प्रतिष्ठानसाठी वास्तूनिधी उभारण्याच्या कामी मदत होईल ही नाविन्यपूर्ण कल्पना त्यांनी आपल्या इतर सहकाऱ्यांच्या सहाय्याने अमलात आणली. हा उपक्रम पुढे ५/६ वर्षे चालला. मग मोबाईल फोन आल्यावर अनेक गोष्टी ज्या वेगाने लुप्त होत गेल्या त्यात ही डायरी लिहिण्याची कलाही हळूहळू अस्तंगत झाली. त्यामुळे निधी संकलनाचा एक भाग असलेली प्रतिष्ठानची डायरी देखील यथावकाश बंद पडली.

काही ना काही कारणाने पुणे शाखेला कधी पदाधिकारी नव्हतेच. पण कार्यवाहपदाची जबाबदारी त्यांनी कोषाध्यक्ष म्हणून काम पाहणारे श्री. अरुणराव व श्रीनिवास गोपाळ मराठे पुणे यांच्या मदतीने पार पाडली. पडद्यामागे अरुणराव यांचा भक्कम पाठिंबा होताच आणि हितगुज संबंधित सर्व कामे श्रीनिवास गोपाळ हे पार पाडीत. या तीन व्यक्तींनी मराठे प्रतिष्ठानची पुणे शाखा नावारुपास आणली. यामुळे प्रतिष्ठानच्या पुण्याच्या वर्तुळात निलांबरी ताईंचा उल्लेख गमतीने 'हायकमांड' असा होई. पुणे शाखेचा वर्धापन दिन हा दरवर्षी साजरा होणारा प्रतिष्ठेचा कार्यक्रम आहे. त्याच्या आयोजनाची व सफल पूर्ततेची जबाबदारी त्यांनी अनेक वर्षे

पार पाडली. अर्थात या विनम्र व्यक्तिमत्त्वाला कार्यक्रमाच्या व्यासपीठावर पाहण्याचा योग सभासदांना कधीच आला नाही. त्या नेहमीच पडद्यामागील कलाकार म्हणून वावरल्या पण प्रत्येक कार्यक्रमाच्या यशस्वी सूत्रधार म्हणून त्यांचे स्थान अबाधित होतं आणि सर्वजण हे जाणूनही होते. अशा या संयमी, विनयशील आणि कार्यकुशल व्यक्तीला सन्मानित करताना ‘मराठे प्रतिष्ठान’ला अत्यंत आनंद होत आहे.

**श्रीमती कुमुद डोके, ठाणे**

पुण्याच्या मराठे प्रतिष्ठानच्या शाखेशी जवळ जवळ सुरुवातीपासूनच संबंधित असलेले वामनराव उर्फ वामनअण्णा यांच्या कन्या ही कुमुद्‌जींची पहिली ओळख. पण हातात विलक्षण कला असलेल्या या मुलीने अल्पावधीत स्वतःची एक नामवंत चित्रकार म्हणून ओळख निर्माण केली. शालेय शिक्षण पार पाडल्यावर रुळलेली वाट न चोखाळता चित्रकलेच्या शिक्षणासाठी अभिनव कला महाविद्यालयात दाखल झाल्या आणि ५ वर्षाचा कोर्स १९७० साली पुरा केला. एक उत्तम चित्रकर्ती असा नावलौकिक होण्याच्या प्रक्रियेला काही कौटुंबिक आघातांमुळे तात्पुरती खीळ बसली. चित्रकला शिक्षक म्हणून डोंबिवलीच्या स्वामी विवेकानंद विद्यामंदिर या शाळेत रुजू झाल्या. आपल्या प्रतिभेच्या उत्कर्षाबरोबरच आपली ही व्यावसायिक बांधिलकी, हा विद्यादानाचा याग त्यांनी पुढे नेटाने २६ वर्षे चालविला. या काळात यशाची अनेक शिखरं त्यांनी पादाक्रांत केली. १९७५ आणि १९७८ साली नाशिक कलानिकेतनच्या चित्रकला प्रदर्शनात प्रथम क्रमांक, बॉम्बे आर्ट सोसायटीच्या स्टेट आर्ट कला प्रदर्शनात व उज्जैन कलामहोत्सवात सहभाग, संस्कार भारतीच्या चित्रकला स्पर्धेत ‘पंढरीची वारी’ या चित्राला विशेष पारितोषिक, आदी पुरस्कारांनी सन्मानित झाल्या. त्यांच्या कलाकृती २००४ सालापासून नेहरू सेंटर आर्ट गॅलरी, वरळी, निताई गौराई आर्ट गॅलरी, ठाणे, दर्पण आर्ट गॅलरी, पुणे आणि या सर्वांवर कडी म्हणजे मुंबईच्या प्रथितयश जहांगीर आर्ट गॅलरी येथे एकल (सोलो) प्रदर्शन अशा ७/८ चित्रप्रदर्शनांद्वारे आजपर्यंत त्या प्रेक्षकांसमोर आल्या आहेत.

कलोपासने बरोबरच आपली सामाजिक बांधिलकी त्यांनी व्यवस्थित जपली. २०१५-१६ दरम्यानच्या प्रदर्शनांद्वारे मिळालेला निधी त्यांनी कॅन्सर रिलीफ फंडास दान केला आहे. डोंबिवली व ठाणे जिल्हा कलाध्यापक संघाच्या त्या १५ वर्षे अध्यक्ष राहिल्या आहेत. महिला दिनानिमित्त महिलांसाठी सातत्याने ५ वर्षे त्यांनी चित्रप्रदर्शन आयोजित केले. आपण शिकवीत असलेल्या शाळेच्या गरजू विद्यार्थ्यांसाठी निधी संकलन, स्पर्धांचे आयोजन असे उपक्रम राबविले. चित्र, दीपशिखा, माझी रचनाचित्रे, रेखांकिता ही चित्रकलेसंबंधी पुस्तके प्रकाशित आहेत. आपल्या चित्रांची भेटकार्डे, संदेशपत्रे, दीपावली शुभेच्छापत्रे असे नाविन्यपूर्ण उपक्रम पार पाडले आहेत.

आपल्या व्यावसायिक व सामाजिक यशाचा आणि कर्तृत्वाचा आलेख चढता ठेवण्याबरोबरच आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्या अतिशय समर्थपणे पेलणाऱ्या कुमुदताई यांचा त्यांच्या पुत्र आणि कन्या यांच्या यशातही मोलाचा वाटा आहे. चित्रकर्ती म्हणून अमाप प्रसिद्धी मिळवलेल्या या समर्थ व्यक्तिमत्वास सादर प्रणाम. त्यांना मराठे कुलभूषण हा पुरस्कार दिल्याने त्या पुरस्काराची शान अधिकच वृद्धिंगत झाली आहे.

♦

## श्री. अच्युत महादेव चक्रदेव यांचा सन्मान

आपले मराठे परिवाराचे ज्येष्ठ कुलबांधव निवृत्त कारागृह अधिक्षक श्री. अच्युत महादेव चक्रदेव (पृ.७३२) यांचा ‘नवजीवन मंडळा’द्वारे स्मृतीचिन्ह आणि मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. नवजीवन मंडळाने पुण्याच्या यशवंतराव चव्हाण रंगमंचात भव्य स्वरूपात हा कार्यक्रम सादर केला होता.

श्री. चक्रदेव यांनी कारागृह अधिक्षक म्हणून काम करताना आणि निवृत्त झाल्यावरही बंदीच्या पुर्नवसनाचे कार्य एकनिष्ठपणे, व्रतस्थपणे मनःपूर्वक केले. काही बंदीना सुटका झाल्यावर पुन्हा आयुष्यात ‘सभ्य नागरीक’ म्हणून नव्याने दंड थोपटून उभे राहण्यासाठी मदत केली. कारागृह सेवेंत असताना, कोणत्याही बंदीकडे, ‘शिक्षा झालेला किंवा भोगलेला बंदी म्हणून पाहिले नाही तर एक नक्की उपयुक्त माणूस याच होकारार्थी विचारांचा श्री. चक्रदेव यांचा दृष्टीकोन होता. म्हणून श्री. चक्रदेव यांचा केलेला उचित सत्कार हा त्यांच्या कार्याचाच एक दृश्य परिणाम होय. म.प्र.ला. त्यांचा अभिमान वाटतो.

मराठे प्रतिष्ठानद्वारा श्री. चक्रदेव यांचे हार्दिक अभिनंदन.

---

### सुविचार

*अप्रियस्य तु पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभः।*

अप्रिय असून हितकर असे भाषण करणारा, असा उपदेश करणारा दुर्मिळ, असे भाषण ऐकून घेणारा त्याहून दुर्मिळ.

# सौ. नीलांबरी मराठे यांचे मनोगत

• सौ. निलांबरी रमेश मराठे (पृ.२८०), पुणे भ्रमणध्वनी: ९४०४२४१७६१

**आ**ज मराठे प्रतिष्ठानतर्फे माझा सत्कार होत आहे याचा मला निश्चितच आनंद होत आहे. कारण सासरच्या माणसांकडून मिळालेला हा सन्मान असल्यामुळे त्याचे मोल अधिक आहे. मी बहुतेक १९९१च्या दरम्यान म.प्र. मध्ये प्रथम आले तेव्हा अण्णा, बापूसाहेब, अरुणराव, रमेश भिकाजी मराठे, अभय जाईल हे सर्व जण म.प्र.चे काम करत होते तेव्हा त्यांनी म.प्र.च्या विद्यार्थ्यांसाठी करीयर गायडन्सचा एक कार्यक्रम ठरवला होता. त्या कार्यक्रमाचे पत्र आमच्या घरी आले होते की तुमच्या घरी कोणी १०वी, १२वीचे विद्यार्थी असतील तर त्यांना या कार्यक्रमासाठी जरूर पाठवावे. मी त्या पत्राचे उत्तर पाठवले की आमच्या घरी १०वी, १२वीचे कोणी विद्यार्थी नाहीत. पण मी स्वतः १०वी-१२वीच्या विद्यार्थ्यांसाठी Aptitude Testingचे काम करते. आपल्याला आवश्यकता वाटली तर मी म.प्र.च्या विद्यार्थ्यांचे Testing सवलतीत करून देईन. पत्र मिळाल्यावर रमेश भिकाजी मराठे मला प्रत्यक्ष भेटायला आले. आमची भरपूर चर्चा झाली. मी त्या कार्यक्रमाला आवर्जून गेले होते. अतिशय चांगले वक्ते होते. पण विद्यार्थी संख्या खूपच कमी होती. फक्त १०-१२ विद्यार्थी होते. ही गोष्ट मला खूप खटकली. मलाच खूप वाईट वाटले आणि तेव्हाच आपण म.प्र. साठी काम करायचे असे मी ठरवले.

तेव्हापासून म.प्र.च्या सर्व कार्यक्रमांना मी उपस्थित राहू लागले. त्यांच्या सर्व मिटींगला जाऊ लागले. प्रारंभापासून म.प्र.चा वर्धापन दिन २६ जानेवारीला पुण्यात होत असे. बापूसाहेबांनी त्यावर्षी २६ जानेवारीच्या कार्यक्रमाची सर्व जबाबदारी माझ्यावर टाकली. कार्यक्रम संपल्यावर बापूसाहेब मला म्हणालेकी कार्यक्रमाचे नियोजन आणि सूत्रसंचालन तू छान केलेस आता यापुढे कायम हे काम नेहमी तूच करायचेस. अशा प्रेरणेतून माझाही उत्साह वाढला आणि मी जोमाने म.प्र.चे काम करू लागले. माझे काम वाढले पण रमेश भिकाजी यांचा कामाच्या व्यापामुळे सहभाग कमी झाला. तेव्हा ते नेहमी म्हणायचे की मी आता योग्य व्यक्ती मिळवून दिली आहे. यापुढे सर्व नीलांबरी पाहील. ते नंतर कोकणात स्थाईक झाल्यामुळे त्यांचे म.प्र.चे काम थांबले.

मी म.प्र.चे काम करताना जनसंपर्क वाढवायचा असे उद्दिष्ट ठेवले होते. २६ जानेवारीच्या कार्यक्रमात मी विविधता आणण्याचा प्रयत्न केला त्यामध्ये गाणे, नृत्य, नाट्य, कथाकथन, व्याख्याने, चर्चा, नकला, विनोदी किस्से, स्लाईड शो, प्रश्नमंजुषा, परस्पर परिचय, सत्कार अशा विविध कार्यक्रमात मराठ्यांच्याच सहभाग असायचा. अण्णांनी (वामन आत्माराम मराठे) कमीत कमी खर्चात कार्यक्रम करायला सांगितला होता. त्यामुळे तेव्हा आम्ही कोणालाही मानधन देत नव्हतो. पण कार्यक्रम दर्जेदार असायचा त्यामुळे दिवसेंदिवस उपस्थिती वाढू लागली. साधारण १००-१२५ उपस्थिती असायची. त्यामुळे बाहेरगावहून सुद्धा काही कुलबांधव आपली कला सादर करण्यासाठी स्वखर्चाने आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी अनुराधा मराठे गणेश स्तवन म्हणायच्या त्यामुळे खूप छान वातावरण निर्मिती व्हायची. या कार्यक्रमाचे आमंत्रण आम्ही ५० पैशाच्या पोस्टकार्डवर लिहून पाठवत होते. अगदी पूर्वी २६ जानेवारीला आम्ही वेदशास्त्रोत्तेजक सभागृहातून आत येताना फक्त पेढा देत होतो. नंतर संक्रांतीचे दिवस असल्यामुळे जाड मोठी तिळगुळाची वडी देऊ लागलो. कालांतराने सुरेशभाऊ आणि आनंदरावांच्या सांगण्यावरून अल्पोपहार सुरू केला. ती प्रथा आजतागायत चालू आहे. १५ ते २० हजारात अल्पोपहारासकट आमचा २६ जानेवारीचा खर्च असायचा. या कार्यक्रमामुळे जनसंपर्क खूप वाढला.

दुसरे म्हणजे पूर्वी मराठे प्रतिष्ठानचे वधूवर सूचक मंडळ निर्मलाताई चालवायच्या नंतर त्या शारीरिकरित्या थकल्यामुळे ही जबाबदारी त्यांनी माझ्यावर सोपावली. तेव्हापासून मी माझ्या ऑफीसमध्येच म.प्र.चे वधूवर सूचक मंडळ सुरू केले. आपण फक्त १० रु. फी घेत होतो. ती सर्वांना परवडणारी असल्यामुळे भरपूर स्थळे यायची. चिंचवडचे प्रभाकर मराठे, भांडारकर रोडवरच्या शालिनीताई मराठे, सांगलीचे वि.म. मराठे लग्न जमावण्याचे काम करायचे त्यामुळे त्यांच्याकडील स्थळे ते मला द्यायचे व माझ्याकडील स्थळे मी त्यांना द्यायची. त्यामुळे स्थळांची संख्याही वाढायची. पालक खूष व्हायचे. बरेच पालक म्हणायचे की बाहेर १००० रु. भरून जेवढी स्थळे मिळत नाहीत त्यापेक्षा जास्त स्थळे म.प्र. मध्ये १०रु. त मिळतात. त्यामुळे ते पालक इतरांनाही सांगायचे. माऊथ पब्लिसिटीने वधूवरांचे पालक यायचे.

काही वर्ष 'हितगुज'मधूनही आपण वधूवरांची स्थळे दिली. 'हितगुज'ची २-३ पाने स्थळे असायची. इतर कोणत्याही मासिकात

वधूवरांची फक्त माहिती देतात पण आपण पत्ता व फोन नंबरसकट सर्व माहिती 'हितगुज'मध्ये द्यायचो. त्यामुळे घरबसल्या लोकांना स्थळांची पूर्व माहिती मिळाल्यामुळे संपर्क साधणं सुलभ व्हायचे. त्यामुळे अनेक लोक 'हितगुज'ची चातकासारखी वाट पाहायचे. कित्येक कुलबांधवांनी मला स्वतःहून सांगितले की आमच्यापेक्षा आमचे शेजारी आणि नातेवाईकच स्थळांसाठी 'हितगुज'ची वाट पाहतात. काही वर्षांनंतर स्थळांसाठी 'हितगुज'च्या २-३ पानांचा खर्च म.प्र.ला परवडेना म्हणून 'हितगुज'मधले हे सदर बंद करण्यात आले. पण म.प्र.च्या वधूवर सूचक मंडळातून अनेक लग्न जमली. भरपूर माणसे भेटली याचे मला पूर्ण समाधान आहे.

मी म.प्र.चे काम करत असतांना बाहेरगावी रत्नागिरी, गोवा आणि कर्नाटक इथे जी अखिल भारतीय अधिवेशने झाली त्यात आम्ही गटाने एकत्रितपणे ५०-६० लोकांची गाडी करून गेलो त्यामुळे जेष्ठ नागरीकांना एकमेकांचा आधार मिळाला. परिचय वाढले आणि भोवतालची प्रेक्षणीय स्थळे पाहता आली. बाहेरगावचे कुलबांधवसुद्धा पुण्यातून आमच्याबरोबर अधिवेशनाला येऊ लागले. त्यामुळे या प्रवासातही सर्वांचा सहवास मिळाला आणि छान अनुभव आले, जनसंपर्क वाढला याचेही खूप समाधान मिळाले.

आम्ही पुण्यातून काही वर्ष डायरीचा प्रकल्पही राबवला. त्यामध्ये पृष्ठदानाची संकल्पना मांडली होती. पृष्ठदानाच्या निमित्तानेही खूप जणांचे सहकार्य मिळाले. भरपूर नविन ओळखी झाल्या.

बरीच वर्ष 'हितगुज'चे अंक आम्ही घरी नेऊन वाटत होतो. पुण्यात विभागावर अनेक कुलबांधव हे काम आवडीने करायचे. त्यामुळे प्रत्यक्ष संपर्क साधता आला. विचारांची देवणाघेवाण होऊ लागली. एकमेकांची सुखदुःख जाणून घेता आली. त्याचा खूपच फायदा झाला.

अशा विविध प्रकारचे काम मी गेली २५-३० वर्ष केले आहे. त्यात मला खूप चांगले अनुभव आले. अनेक चांगली माणसे भेटली. बऱ्याच जेष्ठ आणि श्रेष्ठ लोकांचा सहवास लाभला. मुंबईकडून कायमच पूर्ण सहकार्य मिळाले. त्यामुळे मी म.प्र.च्या कार्यात पूर्ण समाधानी आहे. मला ९९% चांगले अनुभव आले. जो १% वाईट अनुभव आला त्यामध्ये अर्धा टक्का पैसा आणि अर्धा टक्का पुण्यातील काही व्यक्तींचे स्वभाव कारणीभूत ठरले. स्वभावाला औषध नसते. त्याला आपण काही करू शकत नाही. त्यामुळे गेली ३-४ वर्ष मी पुणे शाखेचे काम करणे पूर्ण बंद केले आहे. पण आजही अनेक कुलबांधवांशी फोन किंवा प्रत्यक्ष भेटीतून माझा संपर्क चालू असतो. अजूनही अनेक कुलबांधव त्यांच्याकडच्या कार्यक्रमांना मला बोलावतात. मीही आवर्जून सगळीकडे जाते. याचे मला खूप समाधान आहे.

~~१/२%~~ पैशाच्या बाबतीत पुण्यातीलच काही व्यक्तींनी त्यांच्या अडचणीच्या काळात माझ्याकडून पैसे उसने घेतले होते. ते अद्यापही परत केले नाहीत याचे वाईट वाटते.

मला शेवटी एवढेच सांगावेसे वाटते की मला म.प्र.चे काम करताना जे चांगले अनुभव आले त्यातून मी घडत गेले. आज माझ्याजवळ जी माणसांची श्रीमंती आहे ती म.प्र.मुळेच. गेली २५-३० वर्ष म.प्र.चे काम करण्याची जी संधी मला मिळाली त्याचे आज सत्काराच्या निमित्ताने सोने झाले आहे असे मला मनापासून वाटते. म.प्र. ने आज माझा जो सत्कार केला त्याबद्दल मी म.प्र.ची मनापासून आभारी आहे.

सौ. निलांबरीताईंनी हितगुज निधी, शैक्षणिक मदत निधी आणि वैद्यकीय मदत निधी या तिन्ही निधीसाठी प्रत्येकी रु.१०,०००/- अशी एकूण रु.३०,०००/- चा धनादेश देणगी म्हणून मराठे प्रतिष्ठानला या वार्षिक सभेतील सत्कारास उत्तर देतांना दिला. ♦

## सहवेदना



कै. लीला दिगंबर मराठे पूर्वाश्रमीच्या नीरा सदाशिव जोशी यांचा जन्म नाशिक येथे दिनांक १४ फेब्रुवारी १९३५ला झाला. विसाव्या वर्षी लग्न होऊन त्या मराठ्यांची सून झाल्या. सासरी माहेरी जितक्या म्हणून एखाद्या स्त्रीच्या भूमिका असतात त्या सगळ्या त्यांनी उत्तम रीतीने पार पाडल्या इतकच नाही तर सगळ्या भूमिकेत त्या सगळ्यांच्या त्या त्या नात्यात सर्वात आवडत्या होत्या कारण त्यांनी त्या नात्यांची असलेली अपेक्षित कर्तव्ये खूप मायेने आणि मनापासून पार पाडली. कै दिगंबर मराठे यांचं निधन २३ सप्टेंबर २००३ ला झाले त्या वर्षी त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ लीला मराठेंनी महाराष्ट्र एसएससी बोर्डात इंग्लिश विषयात सर्वात जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक देणेसाठी मराठे प्रतिष्ठान ला रु. १००००/- देणगी दिली.

लीला मराठेंचं १५ जुलै २०१९ ला वयाच्या ८४व्या वर्षी वार्धक्य आणि अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.

जन्म आणि मृत्यू यातील मधलं अंतर म्हणजे आपण जगतो ते आयुष्य. ते आयुष्य त्यांनी सार्थकी तर लावलेच पण मरणोत्तर देहदान करून अगदी जाता जाता त्यांनी एक समाजपयोगी कर्तव्य पार पाडले. त्यांची ही कृती प्रेरणादायी आहे.

**- सौ. जयश्री जयंत दामले**
(पूर्वाश्रमीची मीरा दिगंबर मराठे)
'संचित' गंगापूर रोड, नाशिक ४२२ ००५

# गोमंतकातील नारायण बाळकृष्ण आणि इतर कुलबांधवांचे स्मरण

• कालिदास बा. मराठे (पृ.५४१), गोवा

२०१८-१९ वर्षात आमच्या गोमंतकातील पाच कुलबांधवाचे दुःखद निधन झाले. दोन माझे सख्खे चुलतभाऊ होते.

काशीनाथ कृष्ण (मूळ आंबेली सध्या वास्तव्य म्हापसा येथे असलेल्या) यांचे निधन ५/१०/२०१८ रोजी झाले. ते प्रत्येक संमेलनात उपस्थित राहत. सांगली येथे झालेल्या संमेलनात उपस्थित होते.

६/१०/२०१८ रोजी परशुराम दिवाकर (मूळ पाळी, सध्या मुळगाव) यांचे दुःखद निधन झाले. नंदाभाऊ म्हणून ओळखले जाणारे माझे हे चुलतभाऊ सर्व सार्वजनिक कार्यात तन-मन-धन देऊन सहभागी व्हायचे. मुळगाव येथे झालेल्या तिसऱ्या अखिल भारतीय मराठे परिवार संमेलनाचे कार्यालय त्यांच्याच घरात होते. (२२-२३ फेब्रुवारी १९८६).

माझे दुसरे चुलतभाऊ श्रीपाद नारायण (मूळ पाळी, सध्या वास्तव बेळगाव-कोल्हापूर) यांचे निधन १०/३/२०१९ रोजी झाले. आमच्या घराण्यातील सर्वात ज्येष्ठ बंधू होते. त्यांनी सामाजिक कार्यात नेहमीच भाग घेतला. 'मराठे बखर' म्हणून त्यांनी आमच्या घराण्याचा इतिहास लिहून ठेवलाच. तो एक मौलिक दस्तावेज आहे.

सुगंधा लक्ष्मण - सुगंधावहिनी घराणे क्र. ७२ मधील मराठे परिवाराचे दरवर्षी कुलसंमेलन व्हायलाच हवे असा आग्रह धरणाऱ्या लक्ष्मण पांडुरंग यांच्या पत्नी होत्या. ज्यांचे निधन जूनमध्ये झाले. त्यांचे चिरंजीव अजित लक्ष्मण आपल्या बाबांची परंपरा पुढे चालवित आहेत. त्यांच्या घरी दोन वर्षापूर्वी कुलसंमेलन झाले होते.

आता घराणे क्रमांक ७३ मधील नारायण बाळकृष्ण मूळ गोवा येथील पण वाई, कोलकत्ता आणि शेवटी पुणे येथे वास्तव्याला असणारे यांचे दुःखद निधन ६ जून २०१९ रोजी पुणे येथे झाले.

आपल्या मराठे प्रतिष्ठानचे ते संस्थापक. वडोदरा येथे झालेल्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनात त्यांची गाठ आपले वामन गणेश यांच्याशी पडली आणि प्रतिष्ठानचे बीजारोपण दोघांच्या संवादातून कसे झाले त्याची कथा आपणा सर्वांना माहिती आहेच.

मुळगाव येथे २२-२३ फेब्रुवारी १९८६ साली झालेल्या तिसऱ्या अखिल भारतीय मराठे परिवार संमेलनाचे स्वागताध्यक्ष म्हणून त्यांनी उत्तम प्रकारे जबाबदारी पार पाडली.

त्यांनी त्यावेळी केलेल्या भाषणातील खालील भाग आजही तितकाच महत्त्वाचा आहे. (त्यावेळी प्रसिद्ध झालेल्या स्मरणिकेत त्यांचे भाषण दिलेले आहे.)

**'दैवायत्तं कुले जन्म' असा विवेक करून '~~महामत्रं~~ तु पौरुषम' साधण्यासाठी मराठे कुलबंधूंनी एकत्रित प्रयत्न करावेत असे आवाहन करतो.**

**आपल्या परिवारात उच्चशिक्षित, यशस्वी आणि असामान्य कर्तृत्वाचे लोक कमी नाहीत. तसेच होतकरूही भरपूर आहेत. फक्त 'संहतिः कार्य साधिका' हे त्रिकालाबाधित तत्त्व त्यांनी पटवून घ्यायला हवे आहे. तसे झाले तर 'परस्परं भावयन्तः' 'श्रेयः परमवाप्स्यथ' या सूत्राचे इंगीत त्यांना चांगले समजून येईल. त्यासाठी परिवार संमेलने यशस्वी करायला हवीत. त्यामुळे भावबंध जुळून येतील. स्नेह जमेल आपलेपणा वाढेल आणि त्यायोगे परिवार बलवान होईल.**

संस्कृतवरील त्यांचे प्रभुत्व वरील छोट्या परिच्छेदात दिसते. अशा संस्कृतच्या प्रकांड पंडिताची माझी पहिली भेट १९७२च्या जानेवारी महिन्यात कोलकत्याच्या राष्ट्रीय ग्रंथालयात झाली होती.

मी खरे तर भेटायला गेलो होतो तेथील मराठी विभागाचे संपादक गंगाजळीकार श्री. बा. जोशी यांना. 'साधनाचे' संपादक श्री यदुनाथजी थत्ते यांच्या सांगण्यावरून त्यांना भेटलो त्यावेळी ते म्हणाले तुमच्या गोव्याच्या नारायण बाळकृष्ण यांना भेटणार नाहीत का? माझा त्यावेळी गोव्यात संबंध आला होता त्यांचे पुतणे प्रकाश रामचंद्र यांच्याशी. पण त्यांचे नावही माहीत नव्हते. त्यावेळी मी प्रथम भेटलो आणि मग गोव्यात मराठे परिवाराचे काम सुरू केले. त्यावेळी अनेक बंधू माहित झाले. त्यांचे मोठे बंधू श्री रामचंद्रकाका आणि लक्ष्मणकाका यांची पण ओळख झाली.

अशा नारायणकाकाना आणि काशीनाथ काका, परशुराम दादा, श्रीपाद दादा आणि सुगंधा वहिनीला विनम्र अभिवादन करून थांबतो.

♦

# गणेशोत्सव सजावट स्पर्धा २०१९

आपल्या मराठे प्रतिष्ठानतर्फे सदस्यांसाठी तसेच चित्पावन कपिगोत्री ब्राह्मण असलेल्या मराठे, खांबेटे, चक्रदेव, विद्वांस न तद्जन्य आडनावाच्या व्यक्तींसाठी **'घरगुती गणेशोत्सव सजावट स्पर्धा'** आयोजित केलेली आहे. आपल्या स्वतःच्या घरातील गणपतींसाठी केलेल्या सजावटीची कमाल दोन छायाचित्रे आपण प्रतिष्ठानकडे पाठवून आपण या स्पर्धेत भाग घेऊ शकता. याबाबतचे नियम व अटी पुढीलप्रमाणे:

- **भाग घेण्यासाठी पात्रता :** 'मराठे परिवार' या facebook group वरील सदस्य, मराठे प्रतिष्ठानचे/हितगुजचे सदस्य, मराठ्यांच्या माहेरवाशिणींच्या कुटुंबातील सदस्य, इतर सर्व चित्पावन कपिगोत्री मराठे कुलबांधव.
- **प्रवेशिका कुठे/कशा पाठवाव्या :** 'मराठे परिवार' या facebook group वर upload किंवा admin@maratrhepratishthan.org या इमेल आयडी वर केवळ '.jpg' format मधील कमाल 2 फाईलद्वारे.
- **प्रवेशिका पाठविण्याचा कालावधी :** दि. 2 सप्टेंबर 2019 ते दि. 16 सप्टेंबर 2019.
- छायाचित्राच्या caption मध्ये प्रेषकाचे नाव किंवा शहर यांचा उल्लेख नसावा. प्रवेशिका म्हणून पाठवलेली छायाचित्रे प्रेषकाच्या घरच्या गणपतीच्या सजावटीची असावीत, बिल्डींग/सोसायटी किंवा आळीतील किंवा इतर सार्वजनिक ठिकाणच्या गणपतीच्या सजावटीची नव्हेत. माहेरवाशिणी आपल्या माहेरच्या गणपतीच्या सजावटीची छायाचित्रे पाठवू शकतील.
- प्राप्त झालेल्या प्रत्येक छायाचित्रास एक क्रमांक (आयडी) देण्यात येईल व तो प्रेषकाला कळवला जाईल. त्यासंबंधी असलेल्या विचारणा (enquiry) त्या क्रमांकाचा दाखला देऊन कराव्या.
- या स्पर्धेच्या बाबतीत अंतिम निर्णय परीक्षकांचा असेल. त्यासंबंधी कोणत्याही प्रकारची तक्रार/वादविवाद होऊ नयेत एवढीच माफक अपेक्षा आहे.

**या स्पर्धेतील यशस्वी स्पर्धकांना देण्यात येणारी पारितोषिके:**

**प्रथम पारितोषिक : रु.1001/-** **द्वितीय पारितोषिक : रु. 751/-** **तृतीय पारितोषिक : रु. 501/-**

**20 पेक्षा जास्त प्रवेशिका आल्यास 2 उत्तेजनार्थ बक्षिसेही देण्यात येतील.**

**टीप:**

१. मराठे प्रतिष्ठानच्या **'कार्यकारिणी सदस्यांना'** या स्पर्धेत भाग घेता येणार नाही.

२. पारितोषिक विजेत्यांची निवड, **किमान त्रिसदस्यीय** मंडळ करेल, ज्यात फोटोग्राफी/कला/ सजावट क्षेत्रातील जाणकार दोन/तीन सभासद सदस्य तसेच एक बाह्य परीक्षक असतील.

३. या स्पर्धेसंदर्भात काही शंका किंवा सूचना असल्यास कार्यवाह श्री. हेमंत मराठे यांच्याशी संपर्क साधावा. ई-मेल: hemant.a.marathe@gmail.com, भ्रमणध्वनी: ९२२०६९९९५७

## चुकीची दुरुस्ती

जून २०१९ च्या अंकात देणगीदार व वर्गणीदार सूची छापली होती. त्यात अनावधानाने पुढील नावे राहून गेली होती.

१. सदाशिव धुंडिराज मराठे (मुंबई) : रु. ५०००/- शैक्षणिक मदत निधी

२. मीनल गुप्ता, मुंबई (माहेरवाशीण): रु. ५००/- आजीव सभासद आणि रु २०००/- हितगुज निधी देणगी

३. श्री. मोरेश्वर मराठे (सांगली) : रु. ५००/- अनामिक या नावाने आजीव सभासदत्व सुचीमध्ये नोंदले गेले होते. परंतु नंतर मिळालेल्या माहितीनुसार त्यांनी रु. ५००/-ची देणगी हितगुज साठी दिली आहे. या चुका आर्थिक वर्ष २०१८-१९च्या ताळेबंद व जमाखर्चात आधीच सुधारल्या गेल्या आहेत.

## सहवेदना

मराठे प्रतिष्ठान पुणे शाखेचे अध्यक्ष एअर कमोडर मधुकर कृष्ण मराठे यांचे २६ ऑगस्ट २०१९ रोजी पुणे येथे दुःखद निधन झाले. मधुकर मराठे ह्यांनी B.E.ची पदवी पुणे येथील इंजिनीरिंग महाविद्यालयातून प्राप्त केली व त्यानंतर वायुदलात तांत्रिक विभागात त्यांची निवड झाली. वायुदलात १९६५ व १९७१ सालच्या युद्धात त्यांनी प्रशंसनीय कामगिरी केली. एरोनॉटिकल इंजिनीअरींगचे विशेष शिक्षण त्यांनी रशियात राहून प्राप्त केले. मधुकरराव यांच्या असामान्य कर्तृत्वाची वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट अशी की त्यांना विशिष्ट सेवा पदक (१९९२) व अति विशिष्ट सेवा पदक (१९९६) हे बहुमान राष्ट्रपतींनी बहाल केले अशा तऱ्हेचा बहुमान मिळवणारे भारतीय विमानदलातील एकमेव वरिष्ठ अधिकारी मधुकरराव मराठे आहेत. मराठे परिवारातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली. आत्म्यास सद्गती लाभो

# ‘देव माणूस’ - वि.म.

• सौ. विद्या प्रभाकर वैशंपायन भ्रमणध्वनी : ८९७५३३४१६४

*देखणी ती जीवने। जी तृप्तीची तिर्थोदके।।*
*चांदणे ज्यातून वाहे। शुभ्र वाऱ्यासारखे ।।*
*देखणा देहान्त तो। सागरी सुर्यास्तसा ।।*
*अग्नीचा पेरून जावे। रात्रगर्भि वारसा ।।*

या कविवर्य बा. भ. बोरकर यांच्या ‘देखणे ते चेहरे’या कवितेतील काव्यपंक्ती आमचे दादा (वडील) कै. श्री. विठ्ठल महादेव मराठे यांच्या विषयी जेव्हा लिहायला घेतले तेव्हा पटकन आठवल्या. खरंतर त्यांच्याविषयी मी माझ्या अल्पमतीने काय लिहिणार? पण मागे वळून पाहताना त्यांच्याशी निगडित आठवणींचा पट डोळ्यासमोर आला. एखादी व्यक्ती महान आहे असे म्हणताना आपण म्हणतो ना? की तो देव माणूस आहे. खऱ्या अर्थाने आमचे दादा ‘देव माणूसच’ होते.

२८ नोव्हेंबर १९३४ साली महादेव व मालती यांच्या पोटी जन्म घेऊन अत्यंत कठीण परिस्थितीत हुबळी येथे स्थापत्य अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केले व १९५७ साली मुळा डॅम येथे अत्यंत दुर्गम भागात सेवेला सुरुवात केली. पाटबंधारे खात्यात अभियंता असल्याने बिऱ्हाड पाठीवरच होते. मुळाडॅम, वैतरणा, कोयना, भातसा, तील्लारी अशा अनेक प्रकल्पाच्या ठिकाणी सचोटीने काम करत कोल्हापूर जिल्हापरिषदेतून १९९३ साली निवृत्त झाले. नंतर विश्रामबाग, सांगली येथे स्थायिक होऊन असंख्य व उत्तम मित्र जोडले.

विश्रामबागला आल्यावर त्यांनी निवृत्त अभियंता मंडळाचे संस्थापक अध्यक्ष, ज्येष्ठ नागरिक संघ व विविध स्वयंसेवी संस्थांच्या कार्यात सक्रिय सहभाग घेऊन सामाजिक बांधीलकीचे भानही उत्तमप्रकारे जपले तरुणांना व निरोगी माणसांना लाजवेल असा उत्साह होता. काही वर्षे मोफत वधुवर सुचक केंद्रही चालवले. त्यांच्या या सार्वजनिक कार्याची दखल घेत त्यांना रोटरी क्लब ऑफ कृष्णा व्हॅली तर्फे सन २०१०चा (कै.) टी. के. पाटील तांत्रिक प्राविण्य जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित केले होते. आणि हे सर्व सुरू असताना २०१२ साली कॅन्सरचे निदान झाले. तरीही न डगमगता त्यांचे कार्य चालूच होते.

आयुष्यभरात गाठी असलेल्या अनुभवांचे प्रतिबिंब आपल्या कथा, कविता, विनोद, व्यंगचित्र, विविध विषयांवरील लेख, अशा विविध लेखन प्रकारात उमटवत साहित्यदेवतेची पूजा ही केली. ‘जीवनधारा’ व ‘बुमरँग’ हे कथासंग्रह प्रसिद्ध केले. त्यांचे लेखन उत्तम कथासारख्या प्रथितयश मासिकांतून प्रसिद्ध होऊन बक्षिसेही मिळाली होती. सकाळ, लोकसत्तासारख्या दैनिकांतही विश्रामबागमधील समस्या मांडून त्या कशा सोडवता येतील यावरही लेखन करत.

भुजलसंधारण, भुजलपुनर्भरण यासाठीही खास प्रयत्न केले. या वयातही आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करून मोबाइल, संगणकासारख्या साधनांचा वापर ते लीलया करत असत. हे सर्व निवृत्तीनंतर केले, हे विशेष. आमचे दादा म्हणजे निवृत्तीनंतरचे आणि जवळ जवळ ७ वर्ष कॅन्सरसारखा रोग देहामध्ये वास करत असताना आयुष्य कसे जगावे हे शिकवणारे चालते बोलते उदाहरण होते. या सर्व जीवन प्रवासात त्यांची पत्नी मेधा मराठे हिची मोलाची साथ होती हे वेगळे सांगायला नको.

समाधानी वृत्ती, संवेदनशीलता, संयम, सकारात्मक विचार, सचोटी, समाजऋण फेडण्याचे भान, दुर्दम्य इच्छाशक्ती, विनोदबुद्धी, सहकार्याची भावना, मधुर वाणी अशा कितीतरी गुणांनी युक्त असे ८४ वर्षाचे समृद्ध आयुष्य जगून एक आदर्श पिता व जगनमित्र असलेला हा इहलोकीचा ‘विठ्ठल’ आषाढी एकादशीच्या दोन दिवस आधी १०जुलै २०१९ला पंढरीच्या विठ्ठलाला भेटायला व अनंताच्या प्रवासाला निघून गेला.

त्यांच्या जीवन प्रवासाचे वर्णन करताना शेवटी कविवर्य बा.भ. बोरकरांच्याच शब्दात म्हणावेसे वाटते,

‘देखणी ती पाऊले। जी ध्यासपंथे चालती।
वाळवंटातून सुद्धा। स्वस्तिपद्मे रेखिती।।

आणि म्हणून आम्हां भावंडांचे परमेश्वराकडे हेच मागणे असेल

पावलांवरून त्यांच्या आम्हा चालण्या बुद्धी दे।
त्यांच्याशिवाय जगण्याचे हे ईश्वरा बळ दे, हे ईश्वरा बळ दे।।

♦

## सुविचार

काही व्यक्तींचे आयुष्यातील स्थान एखाद्या हारातल्या दोऱ्याप्रमाणे असते. त्यांचे दिसणे महत्त्वाचे नाही तर असणे महत्त्वाचे असते.

# वाचकांचा पत्रव्यवहार

दि. १२ फेब्रुवारी २०१९

प्रति,
डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे
संपादिका, हितगुज, मराठे प्रतिष्ठान
८/१३, सहकारनगर, वडाळा
मुंबई ४०० ०३१

आदरणीय महोदया,

माहे डिसेंबर २०१९चे हितगुजचे अंकातील 'अग्निसंस्कार' ही कथा (?) आपल्या म्हणण्याप्रमाणे सत्य हकीगत मनाला खूपच भावली. मला माझ्या मोठ्या बहिणीची आठवण झाली. मन विदीर्ण झाले. तिची हकीगत मी पुढील अंकात (जून २०१९) जरूर पाठवीन.

अग्निसंस्कार वाचतांना आपल्या ललीत लेखनाची मजबूत पकड लक्षात आली.

संतांच्या मांदियाळी वरील आपले लिखाणही अत्यंत वाचनीय असते. असेच संतांबद्दलचे लिखाण प्रत्येक अंकांत येईलच ही खात्री आहे. आम्ही वाचक नक्कीच वाट पाहू यात संशय नाही.

आपला
**अ.म.चक्रदेव** (पृ. ७३२), पुणे

प्रति,
संपादिका 'हितगुज'
सप्रेम नमस्कार,

'हितगुज'चे सर्वच अंक वाचनीय व संग्राह्य असतात.

जून १९ चा अंक ही अपवाद नाही त्यातील सर्वच लेख वाचनीय आहेत. 'संवादिनी', 'अंदमान सहल', 'स्वरानुराधा'चे परीक्षण छानच! तीनही कथा ही आवडल्या.

'हेमंत मराठे' यांचा 'कुलबांधवासाठी संवाद' विशेष भावला. मुलांच्या लग्नसंबंधातील विचार पटण्यासारखेच आहेत, आम्ही ही गेली १० वर्षे 'मोफत वधू-वर' संस्था चालवत असून आमचे अनुभव ही असेच आहेत.

सर्वांनी सर्वांशीच संवाद हा वाढविलाच पाहीजे, इतर समाजातील सर्वांशीच 'चांगला व सकारात्मक' संवाद साधला तर, कितीतरी समस्या दूर होऊन 'निरोगी समाज', निर्माण होण्यास आपणा सर्वांचाच 'अल्पसा' हातभार ही महत्त्वाचा ठरेल हे नक्की. पुढील अंकाची नेहमीप्रमाणेच उत्सुकता आहेच.

आपला
**सुधाकर (बाळ) मराठे**
पुणे (९८२२३२९७७०)

## सहवेदना : कै. श्रीमती नीला दत्तात्रय मराठे (पृ. ३३६), मुलुंड



मागच्या पिढीतल्या लोकांनी खूप कष्ट केले, त्याग केला आणि पुढच्या पिढीसाठी काही चांगल्या गोष्टी आमच्यामध्ये रुजवल्या. त्यांच्यापैकीच एक माझी आई. माहेरची कु. वत्सला रामचंद्र जोगळेकर म्हणजेच 'इंदू' व सासरची सौ. निला दत्तात्रय मराठे व ज्येष्ठ जलतरणपट्टू कै. दत्तात्रय आत्माराम मराठे ह्यांच्या धर्मपत्नी.

जन्म ९ ऑक्टोबर १९३३, जन्मस्थळ परळ, मुंबई बालपण व शालेय शिक्षण जेमतेम ८वीपर्यंत. १८व्या वर्षी लग्न व उर्वरीत जीवन मुंबईत.

एक जिद्दी, खंबीर व करारी असे व्यक्तीमत्त्व जिच्या आयुष्यभराचे आम्ही साक्षीदार होतो. कडू गोड आठवणी खूप काही सांगून जातात. चेहेऱ्यावर शांत व गंभीर भाव. अगदी साधे राहणीमान, स्वच्छता, टापटीप व वेळ सांभाळणे ह्याबाबतीत अति दक्ष कणखर स्वभाव व कष्टाळू. स्वतःच्या विचारांवर ठाम, त्यामुळे कृतीमध्ये विश्वास व त्यातून चांगले निर्माण करावयाची इच्छा. शारिरीक चण बारीक यामध्ये आजतागायत काहीही बदल नाही. मिळेल त्यात समाधानी. परिस्थितीनुरूप स्वतःमध्ये बदल घडवायची तयारी. नशिबावर व परमेश्वरावर दृढ विश्वास होता. आयुष्याची अर्धी वाटचाल खडतर व कष्टमय होती. सुखाच्या क्षणी कधी हुरळली नाही वा दुःखात कुढत बसली नाही. एखादी गोष्ट मिळाली नाही म्हणून कधी तक्रार केली नाही.

पेटी वाजवायची आवड होती. चित्रपट पहाण्यामध्ये रस होता. धर्मस्थळे व इतर ठिकाणी फिरून पर्यटनाची हौस भागवली.

शेवटच्या ४ वर्षात वृद्धापकाळातील आजारामुळे मनाने पार खचली. परावलंबी जीवनामुळे हतबल झाली हे जाणवत होते. आज तिचे आशिर्वाद व संस्कार हेच आम्हांसाठी पूंजी आहेत.

२३ जुलै २०१९ रोजी देवाज्ञा झाली. पुढचा प्रवास सुखदायी होवो ही इश्वर चरणी प्रार्थना.

**– श्री. उदयकुमार दत्तात्रय मराठे, मुलुंड**

# साभार पोच




**कस्तुरीमृग –** (रौप्य महोत्सवी कथासंग्रह)


**लेखक :** श्री. नारायण जनार्दन जाईल

**प्रकाशक :** अनघा प्रकाशन, ठाणे (पू.)

**प्रथमावृत्ती :** १४ फेब्रुवारी २०१९

**दूरध्वनी :** २५४०६७१६

- **मूल्य २५०/– रुपये**
- **पृष्ठ संख्या २०८**




**शब्द सुमन –** (कवितासंग्रह)


**कवयित्री :** श्रीमती संध्या खांबेटे (पृ.६९६)

**प्रकाशक :** शुभदा खांबेटे

**प्रथमावृत्ती :** ३ ऑगस्ट २०१९

**भ्रमणध्वनी :** ९८६७०७२२४६

- **मूल्य १००/– रुपये**
- **पृष्ठ संख्या ६४**





**शुरांऽऽ मी वंदीले**

**लेखक :** श्री. प्रताप वेलकर

**प्रकाशक :** श्रीस्वामी समर्थ प्रकाशन, अंधेरी (पश्चिम), मुंबई

**दूरध्वनी :** २८३८२९४१

- **मूल्य २५०/– रुपये**
- **पृष्ठ संख्या १९३**




**दत्तमय जग**

**संध्या सुमन प्रस्तुत, निर्मिती, संकल्पना, गीत, संगीत**

**श्रीमती संध्या खांबेटे (प.६९६)**

**सुश्राव्य गीतांची सीडी**

- **स्वागत मूल्य १५०/– रुपये**

---

**राष्ट्रपुरुषांचे विस्मरण, हे राष्ट्राचे मरण व त्यांचे स्मरण, हे राष्ट्राचे संजीवन याच धर्तीवर म्हणता येईल पूर्वजांचे व प्रेरणा देणाऱ्याचे स्मरण हे कुटुंबाचे संजीवन.**


९ मे २०१९ रोजी झालेल्या माझ्या व्रतबंधानिमित्त पूर्वजांचे स्मरण बाळकृष्ण विश्वनाथ मराठे (पणजोबा), राधाबाई बाळकृष्ण मराठे (पणजी), वासुदेव नरसिंह ताहमनकर (आजोबा), कमल वासुदेव ताहमनकर (आत्याआजी), केशव रामचंद्र गोखले (पणजोबा), सुमन केशव गोखले (पणजी), अतुल सुभाष निरगुडे (आत्याचे यजमान), लक्ष्मीबाई सोहनी (प्रेरणास्थान), सुमित्राबाई सोहनी (प्रेरणास्थान) आज तुम्ही हवे होतात.

स्मरणकर्ता : शार्दूल बाळकृष्ण मराठे (पृ. ५४१), गोवा

आजोबा – कालिदास बाळकृष्ण मराठे

क्षणा क्षणाला मिळते दुःख
अपेक्षांच्या ओझ्यातून
अखंड मिळे सुख
ईश्वराच्या नामातून

## प्रथम स्मृतीदिन



~~प्रोहणारे वीर~~ स्वर्गीय श्री. दत्तात्रेय आत्माराम मराठे ह्यांचा दि. २२ जून २०१९ हा प्रथम स्मृतीदिन. मराठे प्रतिष्ठानासोबत त्यांचा सहभाग अखेरपर्यंत होता. आज सुद्धा त्यांच्या आठवणी स्मृतीपटलावर ताज्या आहेत. त्यांचे चिरंजीव श्री. उदय दत्तात्रय मराठे (पृ.३३६), मुलुंड यांनी त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ 'हितगुज'ला रू. २०००/– देणगी दिली आहे. मराठे प्रतिष्ठानद्वारा श्री. उदय मराठे यांचे आभार.

## न्या. खांबेटे यांचे निधन

लघुवाद न्यायालयाचे सेवानिवृत्त अतिरिक्त मुख्य न्यायाधीश गणेश मोरेश्वर खांबेटे ऊर्फ आबासाहेब खांबेटे (९६) यांचे १५ जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. कर्तव्यकठोर आणि प्रामाणिक न्यायाधीश म्हणून त्यांचा लौकिक होता. त्यांच्या मागे पत्नी, पत्रकार सुपुत्र सतीश खांबेटे, दोन कन्या, नातवंडे आणि अन्य परिवार आहे. त्यांच्या निधनाने न्यायिक क्षेत्रात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# मराठे प्रतिष्ठान
# वार्षिक सर्वसाधारण सभेची क्षणचित्रे



विश्वस्त आनंदराव मराठे सुमेधाताईंना सन्मानित करतांना



विश्वस्त सुलभाताई निलांबरीताईंचा सत्कार करतांना



कार्याध्यक्ष खांबेटे कालिदासजींना सन्मानित करतांना



विश्वस्त मोहनराव कुमुदताईंचा सत्कार करतांना



वार्षिक सर्वसाधारण सभा २०१९ ला उपस्थित कुलबांधव




**कार्यवाह हेमंत मराठे सभेला संबोधित करतांना**



**कार्याध्यक्ष सीताराम खांबेटे संबोधित करतांना**



**कालिदासजींच्या पत्नी सुनंदाताई यांचा साडी देऊन गौरव करतांना विश्वस्त सुलभाताई**




**कोषाध्यक्ष श्रीनिवास मराठे प्रश्नाला उत्तर देतांना**

**BOOK POST**

**If undelivered, Please return to**

संपादिका : **डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई – ४०० ०३१.**

त्रैमासिक ‘हितगुज’ हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०२५ या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादिका : डॉ. सौ. सुमेधा मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई – ४०० ०३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९
इ-मेल : **hitguj@marathepratishthan.org** • वेबसाईट : **www.marathepratishthan.org**